

# अभिमानाची लेणी

देवेंद्र भुजबळ

# अभिमानाची लेणी

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिटे

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.
## साद आहे आमची, हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे.  प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# अभिमानाची लेणी

लेखक : देवेंद्र भुजबळ

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

# अभिमानाची लेणी

लेखक: देवेंद्र भुजबळ

9869484800

Email : devendrabhujbal4760@gmail.com

मुद्रितशोधन: उमा नाबर

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रूपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.  तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

www.esahity.in

esahity@gmail.com

प्रकाशन : २६ जून २०२०(राजर्षी शाहू महाराज जयंती)

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे

## देवेंद्र भुजबळ



देवेंद्र भुजबळ यांनी आर्थिकदृष्ट्या आकर्षक असलेल्या बहुराष्ट्रीय कंपन्या सोडून विचारपूर्वक माध्यम क्षेत्र निवडले. पत्रकार, भारत सरकारच्या दूरदर्शनमध्ये  निर्माता, महाराष्ट्र शासनाच्या माहिती खात्यात अधिकारी म्हणून रुजू होऊन  ते पुढे संचालक म्हणून ते निवृत्त झाले. दूरदर्शनच्या गाजलेल्या **महाचर्चा** कार्यक्रमाचे ते ४ वर्षे रिसर्च अँड रिसोर्स पर्सन तर आकाशवाणी वरील दिलखुलास कार्यक्रमाच्या पहिल्या ५०० भागांचे टीमलीडर होते.

महाराष्ट्र शासनाच्या महान्यूज वेबपोर्टलसाठी करिअर नामा हे सदर त्यांनी सुरू केले. या सदरासाठी ते स्वतः नियमित लेखन करीत. हे लेख विविध वृत्तपत्रातूनही प्रसिद्ध होत. पुढे त्याचेच फलित म्हणजे २५० सरकारी अभ्यासक्रम, प्रशिक्षण यांची माहिती असलेले "**करिअरच्या नव्या दिशा**" हे त्यांचे पुस्तक होय. या पुस्तकाची दुसरी आवृत्ती लवकरच प्रकाशित होत आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून यशस्वी झालेल्या मुली, महिलांवर त्यांनी लिहिलेल्या प्रेरणादायी कथा **गगनभरारी** या पुस्तकात तर युवा आणि पुरुषांच्या प्रेरणादायी कथा **प्रेरणेचे प्रवासी**" या पुस्तकात समाविष्ट आहेत. ऑस्ट्रेलियातील सिडनी येथे झालेल्या चौथ्या विश्व सावरकर साहित्य संमेलनात त्यांचे "स्वातंत्र्यवीर सावरकरांची जाज्वल्य पत्रकारिता" या विषयावर झालेले व्याख्यान विशेष गाजले. पुढे याच नावाने त्यांचे मराठी व इंग्रजी भाषेत पुस्तक प्रकाशित झाले. मलेशियातील **चौथ्या विश्व शब्द साहित्य संमेलनाचे ते उद्घाटक** होते. थायलंड, नेपाळ, रशिया, आर्मेनिया, अझरबईझाण या देशांबरोबरच भारतात, महाराष्ट्रात त्यांची विविध ठिकाणी संवाद सत्रे झाली आहेत, होत असतात. विविध विषयांवर ते

सातत्याने लिहीत असतात. "भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रेरक पत्रकारिता " हा त्यांचा संशोधन पर लेख मराठी बरोबरच हिंदी, इंग्रजी, गुजराती, ऊर्दू भाषेतही प्रसिद्ध झाला आहे. साहित्यिक, सामाजिक, सांस्कृतिक नाट्य, चित्रपट , दूरदर्शन, प्रसार माध्यमे यात कार्यरत राहण्यासाठी देवेंद्र भुजबळ सतत प्रयत्नशील असतात. समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी काम करणाऱ्या सामाजिक संस्थांसाठीही ते काम करत असतात.

देवेंद्र भुजबळ यांचा संपर्क क्रमांक:+91 9869484800.

इमेल: devendrabhujbal4760@gmail.com



# ’अक्षरलेणी’तून सजली अभिमानाची लेणी!



प्रत्येकाच्या जीवनात कुणाची कुणावर ना कुणावर श्रद्धा असते, निष्ठा असते, भक्ती असते आणि त्यातून अशा श्रद्धेय व्यक्तींची अधिकाधिक माहिती मिळवून ती वाचकांपर्यंत, श्रोत्यांपर्यंत पोहोचविण्याचा ध्यास घेतलेल्या अनेक व्यक्ती आज समाजात आहेत. त्यापैकी एक व्यक्ती म्हणजे निवृत्त माहिती संचालक देवेंद्र भुजबळ असे म्हटले तर ते अतिशयोक्तीचे ठरू नये. स्वातंत्र्यवीर सावरकर आणि भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर या दोघांच्या जीवनकार्याचा लेखकाचा सखोल अभ्यास आहे. केवळ अभ्यासच आहे असे नाही तर ते जेव्हा आणि जिथे संधी मिळेल तिथे लेखणी आणि वाणीच्या माध्यमातून या महामानवांच्या विचारांचा प्रसार करतात. म्हणूनच त्यांची निवड ऑस्ट्रेलियातील सिडनी येथे झालेल्या चौथ्या विश्व साहित्य संमेलनात 'स्वातंत्र्यवीर सावरकरांची जाज्वल्य पत्रकारिता' या विषयावर व्याख्यान देण्यासाठी होते हे त्यांच्या सखोल अभ्यासाचे द्योतक आहे. या व्याख्यानातून प्रेरणा घेतलेले लेखक भुजबळ यांनी "स्वातंत्र्यवीर सावरकरांची जाज्वल्य पत्रकारिता " या शीर्षकाचे मराठी आणि इंग्रजी भाषेत पुस्तक लिहिले असून भरारी प्रकाशन, मुंबई यांनी ते प्रकाशित केले आहे.

लेखक देवेंद्र भुजबळ यांची भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरही अत्यंत निष्ठा आहे. त्यांच्या जीवनकार्याचा लेखकाने बारकाईने अभ्यास केला आहे. त्याचे फलित म्हणजे या पुस्तकात त्यांचे 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रेरक पत्रकारिता, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचं कामगार कल्याणातील भरीव योगदान, ज्ञानपुंज डॉ. बाबासाहेब आंबेडकर' असे तीन माहितीपूर्ण आणि वाचनीय लेख आहेत. ह्या लेखांची आणि

लेखकाच्या लेखणीची महानता वाचकांच्या यावरून लक्षात येईल की, भुजबळ यांचा 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रेरक पत्रकारिता' हा लेख मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराती आणि ऊर्दू भाषांमध्ये प्रकाशित झाला आहे. ही फार मोठी गौरवाची बाब आहे. भुजबळ यांच्यासाठी सन्मानाची बाब म्हणजे त्यांची व्याख्याने भारतात तर झालीच आहेत पण थायलंड, नेपाळ, रशिया, आर्मेनिया, अझरबईझाण या देशातील संवाद सत्रांमध्ये त्यांनी सहभाग नोंदवला आहे.

देवेंद्र भुजबळ यांनी 'अभिमानाची लेणी' या पुस्तकात सावरकर, आंबेडकर यांच्यासोबतच 'राष्ट्रभक्त राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, गुरुदेव रवींद्रनाथ टागोर, क्रांतिसूर्य महात्मा फुले, लोकशाहीर अण्णा भाऊ  साठे, सानेगुरुजींची शाळा, दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर, बुद्ध वंदन, युगप्रवर्तक शाहू महाराज, उत्तम बंडू तुपे अशा महनीय व्यक्तिंची विविध क्षेत्रातील कामगिरीची माहिती वाचकांसमोर मांडली आहे.

'जन गण मन' या राष्ट्रगीताने घराघरात पोहोचलेले आणि मनामनामध्ये घर केलेले, ऐकणारांच्या शरीरात एक वेगळे स्फुल्लिंग चेतवणारे रवींद्रनाथ टागोर यांच्याविषयीची कृतज्ञता लेखक देवेंद्र भुजबळ यांनी 'गुरुदेव रवींद्रनाथ टागोर' या लेखातून प्रकट केली आहे. इंग्लंडमध्ये वकिलीची पदवी घेण्यासाठी गेलेले रवींद्रनाथ हे शिक्षण अर्धवट सोडून भारतात परततात आणि 'चार भिंतीमधील शिक्षण माणसाला खरं घडवू शकत नाही' या विचारातून खुल्या हवेतील शिक्षणाचा ध्यास घेऊन 'शांतिनिकेतन'ची स्थापना करून शिक्षणाचा प्रसार करतात. नोबेल सर्वोच्च जागतिक पुरस्कार रवींद्रनाथांना प्रदान केला जातो, त्या वेळी ते हा पुरस्कार प्राप्त करणारे आशिया खंडातील पहिली व्यक्ती ठरतात ही गोष्ट आम्हा भारतीयांची मान उंचावणारी आहे. दुसरीकडे ब्रिटिश सरकारने त्यांना 'सर' ही मानाची पदवी बहाल करून त्यांचा सन्मान केला असला तरीही पुढे जालियनवाला हत्याकांडाचा निषेध म्हणून जेव्हा

टागोर ती पदवी परत करतात त्या वेळी त्यांच्या देशाभिमानापुढे नतमस्तक व्हावेसे वाटते, अशा घटनांची माहिती लेखकाने अत्यंत सोप्या भाषेत दिली आहे.

भारतात अनेकविध सामाजिक सुधारणेचे प्रणेते म्हणून ज्यांच्याकडे आदराने पाहिले जाते अशी व्यक्ती म्हणजे थोर समाजसुधारक महात्मा जोतिबा फुले! 'क्रांतिसूर्य महात्मा फुले' या लेखामध्ये महात्मा फुले यांच्या सामाजिक सुधारणांचा भुजबळ यांनी तन्मयतेने आढावा घेतलेला आहे. 'मुलींच्या शिक्षणासाठी, बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी त्यांनी केलेले प्रयत्न, मुलींसाठी स्थापन केलेली भारतातील पहिली शाळा, अस्पृश्यांसाठी सुरू केलेली पहिली शाळा, रात्र शाळेचा अभिनव प्रयोग' अशा अनेक समाजोपयोगी आणि सामाजिक उद्धारासाठी महात्मा फुले यांनी केलेल्या कामांचे वर्णन लेखकाने कृतज्ञतापूर्वक केले आहे. एकेकाळी विधवा स्त्रियांना एक प्रकारचे शापित जीवन जगावे लागायचे. महात्मा फुले यांनी विधवांना विवाहाची परवानगी मिळावी म्हणून आवाज उठवला. त्यासाठी त्यांनी पुढाकार घेऊन विधवा विवाह घडवून आणल्याची नोंदही लेखकाने घेतली आहे. 'सत्यशोधक समाज' या ऐतिहासिक संस्थेची केलेली स्थापना असेल, स्वतःच्या राहत्या घरातील पाण्याचा हौद खुला करण्याची घटना असेल, खत फोडीचे बंड असेल, दारूची दुकाने बंद करण्यासाठी केलेला आग्रह असेल अशा अनेक घटनांचे वर्णन भुजबळ यांनी ओघवत्या भाषेत केले आहे.

भारतीय सामाजिक कार्यात योगदान देणारे एक उत्तुंग व्यक्तीत्व म्हणजे लोकशाहीर अण्णा भाऊ  साठे! देवेंद्र भुजबळ यांनी 'लोकशाहीर अण्णा भाऊ  साठे: उत्तुंग प्रतिभेचा आविष्कार' या शीर्षकाचा लेख या पुस्तकात समाविष्ट केला आहे. चौथीपर्यंत शिक्षण झालेल्या अण्णांनी गाव सोडलं आणि जन्मगावापासून पायी चालत थेट मुंबई गाठली. मिळेल ते काम करीत पोटाची भूक भागवत असताना ते शाहिरी कलेकडे आकर्षित झाले आणि शाहिरीतून जन जागरण करताना अण्णा भाऊ  साठे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी प्रभावित होऊन आंबेडकर चळवळीत मोलाचे योगदान देत असताना त्यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या

चळवळीत लक्षणीयरीत्या सहभाग घेतला. असे अण्णांचे सामाजिक कार्य मांडत असताना भुजबळ यांच्या लेखणीला अण्णा भाऊ  साठे यांच्या साहित्यिक प्रवासानेही भुरळ घातली आहे. त्यांची 'फकिरा' कादंबरी आणि रशिया या देशाला जाऊन आल्यानंतर लिहिलेले प्रवास वर्णन भारतीय भाषांसोबत परकीय सत्तावीस भाषांमध्ये अनुवादित झाले असल्याची नोंद लेखक मोठ्या अभिमानाने घेतात.

पांडुरंग सदाशिव साने अर्थात साने गुरुजी! 'श्यामची आई' या पुस्तकाच्या रूपाने घराघरातील आबालवृद्धांच्या ह्रदयात वसलेल्या सानेगुरुजींनी शिक्षक म्हणून काम केलेली शाळा म्हणजे जळगाव जिल्ह्यातील अमळनेर येथील शाळा ! या शाळेतील विद्यार्थ्यांच्या चुकीला स्वतःची चूक समजून स्वतःलाच शिक्षा करून घेणारे शिक्षक म्हणजे साने गुरुजी ! अशा अनेक विद्यार्थ्यांच्या चुकीसाठी स्वतःला शिक्षा करून घेतल्याचे लेखकाने रेखाटलेले अनेक प्रसंग वाचताना डोळे पाणवतात. साने गुरुजी  शिक्षक असलेली शाळा पाहावी, तेथील कार्य प्रत्यक्ष अनुभवावे या हेतूने लेखक देवेंद्र भुजबळ यांनी सहकुटुंब अमळनेर येथील शाळेला भेट दिली असल्याचे लेखक अभिमानाने नोंदवतात.

वृत्तपत्राच्या क्षेत्रात आदराने घेतले जाणारे एक प्रमुख नाव म्हणजे बाळशास्त्री जांभेकर! दर्पणकार म्हणून सर्वदूर परिचित असलेल्या आणि जेमतेम वयाची विशी गाठलेल्या बाळशास्त्रींनी मराठी भाषेतील पहिले वृत्तपत्र ६ जानेवारी १८३२ यादिवशी प्रकाशित केले. बाळशास्त्रींचा नऊ भाषांचा अभ्यास केला होता. दर्पण हे वृत्तपत्र मराठीसोबतच इंग्रजीतही प्रकाशित होत असे. १८१२ साली कोकणातील देवगडजवळील पोंभुर्ले या गावी जन्म झालेले बाळशास्त्री वय वर्षे तेरा असताना मुंबई शहरी दाखल झाले. बाळशास्त्री जांभेकर यांचे कार्य लेखकाने मोठ्या तन्मयतेने साकारले आहे.

"अभिमानाची लेणी " या चरित्रात्मक पुस्तकात लेखक देवेन्द्र भुजबळ यांनी 'बुद्धवंदन' या शीर्षकाच्या लेखात गौतम बुद्ध यांच्या कार्याचा ओघवत्या भाषेत वेध घेतला आहे. त्यांनी

केलेला गृहत्याग, शारीरिक यातनामय साधना पद्धती, गौतम बुद्धांनी सद्धम्माचा प्रचार करण्यासाठी सतत ४५ वर्षे केलेला पायी प्रवास अशा इतर अनेक घटनांचे वर्णन वाचताना डोळे अश्रू प्रसवतात. तसेच गौतम बुद्ध यांनी सांगितलेल्या विपश्यनेचे महत्त्व विषद करून ही उपासना स्वतः अनुभवली असल्याचे लेखक लिहितात त्या वेळी लेखक भुजबळ यांच्याबद्दलचा आदर दुणावतो.

भारतीय सामाजिक सुधारणेचे प्रणेते म्हणून ज्यांच्याकडे पाहिले जाते त्या छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचे जीवन चरित्र लेखकाने 'युग प्रवर्तक शाहू महाराज' या लेखात मोठ्या मनोभावे लिहिले आहे. शाहू महाराज यांचे जीवन उणेपुरे अठ्ठेचाळीस वर्षांचे. पण या अल्पायुषी जीवनात त्यांनी केलेले कार्य त्यांना अजरामर करते आहे. शाहू महाराजांच्या एकूणच जवळपास सर्व कामगिरींची, सुधारणेची माहिती भुजबळ यांनी अत्यंत तळमळीने लिहिली आहे.

'तुकड्या म्हणे.. ' या शब्दांनी आपल्या रचनेची सांगता करणारे, भजने, अभंग, ओव्या याद्वारे समाज जागृतीचे महान कार्य करणारे तुकडोजी महाराज यांचे चरित्र अत्यंत जिव्हाळ्याने लेखकाने आपल्या समोर ठेवले आहे. ते वाचनीय, मननीय, अनुकरणीय असेच आहे. 'चले जाव' या लढ्यात सहभागी झालेले, सातत्याने सामाजिक कार्यात सक्रिय असणारे, जपान देशातील विश्व धर्म परिषदेत निमंत्रित असलेले संत तुकडोजी महाराज यांनी भूदान चळवळ, पानशेत धरण प्रकल्प, कोयना भुकंप, हिंदू-मुस्लिम दंगा या वेळीही बघ्याची भूमिका न घेता चोख भूमिका बजावली. १९६५ ला पाकसमवेत युद्ध सुरू असताना आपल्या सैनिकांमध्ये जोश, स्फूर्ती निर्माण करण्यासाठी सीमावर्ती भागात जाऊन त्यांची भेट घेणारे, ग्रामविकासाच्या संदर्भात 'ग्रामगीता' सारखा सार्वकालिक उपयुक्त ग्रंथ लिहणारे अशी तुकडोजी महाराज यांची नानाविध रूपे भुजबळ यांनी अतिशय अभ्यासपूर्ण रीतीने रेखाटली आहेत.

उत्तम बंडू तुपे महाराष्ट्रातील एक थोर साहित्यिक! तुपे यांचा एकूण साहित्य प्रवास साध्या, सोप्या भाषेत वाचकांपर्यंत पोहोचविण्याची फार मोठी कामगिरी लेखक देवेंद्र भुजबळ यांनी पार पाडली आहे.

एकंदरीत 'अभिमानाची लेणी' या ऑनलाईन लेख संग्रहातील एकूण एक लेख त्या त्या चरित्र नायकाला न्याय देणारे, त्यांची कामगिरी ठळकपणे अधोरेखित करणारे असे आहेत. तसे पाहिले तर साहित्य क्षेत्रात जर कोणता विभाग जास्त अवघड असेल तर तो म्हणजे चरित्र लेखन! प्रत्येक चरित्र नायक हा समाजाचे श्रद्धास्थान असतो, समाजाच्या भावना त्या नायकाशी जोडलेल्या असतात. म्हणून चरित्र लेखन करताना कल्पनेच्या भराऱ्या घेता येत नाहीत. वास्तवाशी नाळ ठेवून नायकाचे चरित्र उभे करावे लागते. ही अशी भूमिका लेखक देवेंद्र भुजबळ यांनी लीलया साधली आहे. त्यांची लेखणी वास्तवाशी कुठेही फारकत घेत नाही. साध्या, सरळ आणि रसाळ भाषेत लेखन हा त्यांचा भक्तिभाव "अभिमानाची लेणी " या पुस्तकात आढळून येतो. त्यांना भरभरून शुभेच्छा !

ई साहित्य प्रतिष्ठान टीमने हे आकर्षक पुस्तक वाचकांपर्यंत पोहोचवण्यासाठी सज्ज केले आहे. त्यांनाही खूप खूप शुभेच्छा!

नागेश सू. शेवाळकर,

पुणे (९४२३१३९०७१)


# अभिमानाची लेणी

अभिमानाची लेणी

# अनुक्रमणिका

1. क्रांतिसूर्य:महात्मा फुले
2. राष्ट्रभक्त राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
3. ज्ञानपुंज डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर
4. भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे कामगारकल्याणातील भरीव योगदान
5. गुरुदेव रवींद्रनाथ टागोर
6. बुद्धवंदन
7. दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर
8. स्वातंत्र्यवीर सावरकरांचे सामाजिक समतेसाठी अमूल्य योगदान
9. लोकशाहीर अण्णा भाऊ साठे: उत्तुंग प्रतिभेचा आविष्कार
10. साने गुरुजींची शाळा
11. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रेरक पत्रकारिता
12. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रेरक पत्रकारिता
13. भाग - 2
14. स्वातंत्र्यवीर सावरकरांची जाज्वल्य पत्रकारिता
15. छत्रपती राजर्षी शाहू महाराज
16. 'झुलवा'कार उत्तम बंडू तुपे
17. आचार्य विनोबा भावे
18. वि. स. पागे:रोजगार हमी योजनेचे शिल्पकार
19. कर्मयोगी रामभाऊ मंडलिक

# क्रांतिसूर्य:महात्मा फुले



भारतातील विविध सामाजिक सुधारणांचे प्रणेते, शिक्षणाचं महत्त्व ओळखलेले, सर्वांना ते कृतीतून दाखविणारे क्रांतिसूर्य महात्मा ज्योतीबा फुले यांची ११एप्रिल २०२०रोजी १९३वी जयंती होती. काळ जसा पुढे जात आहे तसे त्यांचे विचार , कार्य अधिकच तेजाने तळपत आहे. विद्येविना मती गेली, मतीविना गती गेली, गतीविना वित्त गेले, वित्ताविना शूद्र खचले, एव्हढे अनर्थ एका अविद्येने केले हे रास्तपणे सांगितलेल्या महात्मा फुले यांच्या पुरोगामी महाराष्ट्र राज्यात त्यांच्या नावाने असलेले महात्मा फुले कृषी विद्यापीठ , त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांच्या नावाने असलेले सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ म्हणजे बहुधा जगातील असे एकमेव उदाहरण असावे.

थोर , सदा वंदनीय महात्मा फुले यांचे विचार, जीवन, कार्य जाणून घेण्याचा प्रयत्न या लेखातून आपण करू या..

महात्मा ज्योतिबा फुले यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील कटगुण येथे ११ एप्रिल१८२७ रोजी झाला. सन १८३४ ते १८३८ दरम्यान त्यांचे शिक्षण पंतोजीच्या शाळेत झाले. १८४० साली

सावित्रीबाईशी त्यांचा विवाह झाला. विशेष म्हणजे विवाहानंतर स्कॉटिश मिशन हायस्कूलमधून १८४१ ते १८४७ दरम्यान त्यांनी इंग्रजी शिक्षण घेतले. दिवसेंदिवस आपल्याला आरोग्याचं महत्त्व कळत आहे. पण हे महत्त्व ओळखून महात्मा फुले यांनी १८४७ साली लहुजी वस्ताद साळवे यांच्याकडून शारिरिक शिक्षण घेतलं. त्याच वर्षी त्यांनी थॉमस पेन यांच्या प्रसिध्द 'राईट ऑफ मॅन' या ग्रंथाचा अभ्यास केला.

१८४८साली एका मित्राच्या विवाहप्रसंगी निघालेल्या मिरवणूकीत उच्च वर्णियांकडून महात्मा फुले यांचा अपमान झाला. बहुधा तेथूनच सामाजिक समतेची ज्योत पेटवण्याची सुरुवात झाली असावी. त्याच वर्षी त्यांनी बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी काम सुरू केले. तसंच भारतातील मुलींची पहिली शाळा सुरू केली.

वाचन हे शिक्षणाचं, संस्काराचं महत्त्वाचं माध्यम आहे, हे ओळखून महात्मा फुले यांनी १८५२मध्ये पूना लायब्ररीची स्थापना केली. त्याच वर्षी, मार्च महिन्यात त्यांनी वेताळ पेठेत अस्पृश्यांसाठी पहिली शाळा सुरू केली. महात्मा फुले यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव म्हणून १६नोव्हेंबर १८५२ रोजी ब्रिटीश सरकारतर्फे मेजर कॅन्डी यांनी त्यांचा विश्रामबाग वाड्यात सत्कार केला.

महात्मा ज्योतिबा फुले यांनी १८५३ साली 'दि सोसायटी फॉर प्रमोटिंग दि एज्युकेशन ऑफ महार, मांग अँण्ड अदर्स' या संस्थेची स्थापना केली. १८५४साली ते स्कॉटिश मिशनच्या शाळेत अर्धवेळ शिक्षक म्हणून रुजू झाले. पुढच्याच , म्हणजे १८८५ साली त्यांनी रात्र शाळेची सुरुवात केली. १८५६ साली मारेकरी घालून त्यांच्या हत्येचा प्रयत्न झाला. त्यांनी १८५८ मध्ये शाळांच्या व्यवस्थापन मंडळातून निवृत्ती घेतली.

आपण पहातो की, आजही आपल्या समाजात ज्या प्रमाणात विधवा विवाह व्हायला हवेत, ते होत नाहीत. विधवांना मानहानीचं जीवन जगावं लागतं. पण ज्योतिबांनी १८६०साली विधवा विवाहास सहाय्य केले. पुढे १८६३साली त्यांनी बाल हत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली. तर

१८६४साली गोखले बागेत विधवा विवाह घडवून आणला. त्या काळी विधवा महिला कुरूप दिसाव्यात म्हणून त्यांचे केशवपन म्हणजे त्यांच्या डोक्यावरचे सर्व केसं काढून डोकं तुळतुळीत ठेवण्याची प्रथा होती. ती प्रथा मोडित निघावी म्हणून ज्योतिबांनी न्हाव्यांचा संप घडवून आणला. आपल्या समाजात आज ही प्रथा राहिलेली नाही , हे आपण पहातोच आहे.

महाराष्ट्रात १८६८ मध्ये मोठा दुष्काळ पडला होता. पाण्याची प्रचंड टंचाई निर्माण झाली होती. संवेदनशील ज्योतिबांनी त्या काळात ते रहात असलेल्या घरातील पाण्याचा हौद अस्पृश्यांसाठी खुला केला.

सामाजिक सुधारणांना निश्चित दिशा प्राप्त व्हावी , यासाठी महात्मा फुले यांनी १८७३साली 'सत्यशोधक' समाजाची स्थापना केली. त्यांचे हे एक ऐतिहासिक , दुरगामी कार्य होय. सत्यशोधक समाजातून पुढे अनेकानेक व्यक्ती घडत गेल्या. त्यातील एक प्रमुख म्हणजे दिनमित्रकार संपादक मुकुंदराव पाटील हे होत.

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या कार्यावरअनेक महनीय व्यक्तींनी अनेक ग्रंथ, शोध प्रबंध लिहिले. महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेला, डॉ. धनंजय कीर, डॉ. सं. ग. मालशे, डॉ. य. दि. फडके यांनी संपादित केलेला महात्मा फुले समग्र वाङ्मय हा त्या वेळी नुकताच प्रसिद्ध झालेला ग्रंथ सदर लेखाचे लेखक देवेंद्र भुजबळ यांना त्यांचे मुंबई दूरदर्शन केंद्रातील वरिष्ठ अधिकारी, "आमची माती, आमची माणसं" कार्यक्रमाचे निर्माते शिवाजी फुलसुंदर यांनी आत्मीयतेने भेट दिला होता. देवेंद्र भुजबळ महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या सेवेत असताना त्यांचे सहकारी डॉ. संभाजी खराट यांनी महात्मा फुले यांच्या जीवन, कार्यावर अभ्यासपूर्ण १० पुस्तकं लिहिलीत. संपादक मुकुंदराव पाटील यांच्या पत्रकारितेवर संशोधन करून डॉ. खराट यांनी पीएच. डी. मिळविली आहे. ही आमच्यासाठी नेहमीच अभिमानाची गोष्ट आहे.


ज्योतिबांनी १८७५ साली शेतकऱ्यांच्या शोषणाविरुध्द अहमदनगर येथे खत फोडीचे बंड घडवून आणले. त्याचवर्षी थोर समाज सुधारक स्वामी दयानंद सरस्वतींची पुणे येथे मिरवणूक काढण्यास सहाय्य केले. त्यानंतर १८७६ ते १८८२ अशी सहा वर्षे ते पुणे नगरपालिकेचे सदस्य होते. या दरम्यान१८८० साली त्यांनी दारुची दुकाने उघडण्यास विरोध केला होता. भारतातील 'मिलहँण्ड असोसिएशन' या पहिल्या कामगार संघटनेच्या स्थापनेत थोर कामगार नेते नारायण मेघाजी लोंखडे यांना महात्मा फुले यांनी सहाय्य केले होते.

समाजाच्या प्रगतीसाठी शिक्षणाचं अतोनात महत्त्व आहे , हे ओळखलेल्या, त्यासाठी सतत प्रयत्नशील असलेल्या ज्योतिबांनी विल्यम हंटर शिक्षण आयोगासमोर निवेदन दिले. या निवेदनात त्यांनी समाजातील सर्वांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत देण्याची आग्रही मागणी केली. ज्योतिबांनी सत्यशोधक समाजातर्फे नवीन मंगलाष्टकांची, पूजाविधीची रचना करून १८८७ साली पुरोहितांशिवाय विवाह घडवून आणण्यास सुरुवात केली. १८८८मध्ये डयुक ऑफ कॅनॉट यांनी त्यांचा सत्कार केला. त्याचवर्षी मुंबईतील कोळीवाडा येथे जनतेने रावबहादूर वडेकर यांच्याहस्ते ज्योतिबांचा सत्कार करून त्यांना महात्मा पदवी प्रदान केली.

असा हा महान क्रांतिसूर्य २८ नोव्हेंबर १८९० रोजी काळाच्या आड गेला. तरी त्यांच्या विचाराने, कार्याने तो आजही तळपळतच आहे आणि पुढेही तळपतच राहील. त्यांनी हाती घेतलेले कार्य पूर्णपणे पूर्ण झाले, असे आपल्याला म्हणता येणार नाही. महात्मा फुले यांचे विचार, कार्य, जीवन आपण सतत आचरणात आणणे अजूनही नितांत गरजेचे आहे. शेवटी सामाजिक प्रगती हा एक प्रवाह आहे. तो सतत वाहता राहील, स्वच्छ राहील यासाठी आपण सक्रिय प्रयत्न करणं हाच आधुनिक भारताच्या उभारणीतील आपला महत्त्वाचा वाटा असेल.

महात्मा फुले यांना विनम्र अभिवादन....

# राष्ट्रभक्त राष्ट्रसंत तुकडोजी महाराज



कोरोनाच्या जीवघेण्या , भयंकर संकटाशी भारत सरकार, महाराष्ट्र शासन, सर्व संबंधित यंत्रणा अहोरात्र लढत आहे. या परिस्थितीत समाजाची अनुकूल मनोभूमिका घडविण्यासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आज हवे होते, असे क्षणोक्षणी वाटतंय. तुकडोजी महाराजांचे प्रेरणादायी स्मरण............

तुकडोजी महाराज यांचा जन्म ३० एप्रिल १९०९ रोजी अमरावती जिल्ह्यातील यावली येथे झाला. आई मंजुळाबाई आणि वडील बंडोजी ठाकूर यांनी त्यांचं माणिक नाव ठेवलं. वडील शिवणकाम करत. आई वरखेड येथील तुकारामबुवा वानखेडे यांची मुलगी होती. बालपणीच

आई बरोबर त्यांना घर सोडून वरखेड इथे यावं लागलं. वरखेड येथे संत अडकूजी महाराज यांच्या सहवासात तुकडोजी महाराज यांचं अंतरंग फुललं. अभ्यासापेक्षा खेळण्याची त्यांना विशेष आवड होती. तरी तिसरीपर्यंत त्यांचं शिक्षण झालं. अडकूजी महाराज यांना त्यांनी गुरू मानलं. अडकूजी महाराज यांनीच त्यांना तुकड्या हे नाव दिलं. दरम्यान तुकडोजी महाराज आपल्या यावली गावी आले. तिथे आल्यावर काही दिवसांनी गुरू अडकूजी महाराज यांचे देहावसान झाल्याचं कळालं. गुरू वियोगामुळे त्यांना वैराग्य आलं. घरचं शिवणयंत्र त्यांनी विकलं. तपश्चर्या करण्यासाठी ते निघून गेले. त्यांनी पुढील जीवन राष्ट्रभक्ती, समाज सुधारणा, ग्राम विकास, सक्रिय अध्यात्म यासाठी अर्पण केले. तुकडोजी महाराज यांनी ३ हजार मराठी हिंदी भजने, २ हजार अभंग, ५ हजार ओव्या लिहिल्या. खंजिरी वाद्य वाजवून रसाळ पणे ते कीर्तन करून उपस्थितांना मंत्रमुग्ध करत. लेखनात शेवटी ते तुकड्या म्हणे असे लिहीत. म्हणून लोक आदराने त्यांना तुकडोजी महाराज म्हणू लागले. सामान्य माणूसच नाही तर तत्कालीन थोर राष्ट्रीय नेते, संपादक, पत्रकार, समाजधुरीण त्यांच्या विचारांनी , कार्यांनी प्रभावित झाले होते. तुकडोजी महाराजांनी १९४२च्या चले जाव आंदोलनात सक्रिय भाग घेतला होता. त्यामुळे त्यांना ४ महिन्यांची सजा भोगावी लागली. त्यानंतरही इंग्रज सरकारने त्यांना चन्द्रपूर, वर्धा जिल्हा बंदी केली होती. भारत देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सरकारच्या समाज कल्याण, परिवार नियोजन, नशा बंदी अशा अनेक उपक्रमात त्यांनी सतत सहभाग घेतला. अमेरिकेत १९५२ झालेल्या, जपानमध्ये १९५५ मध्ये झालेल्या विश्व धर्म परिषदेत त्यांना निमंत्रित करण्यात आले होते. १९५६ मध्ये त्यांनी भारत साधू समाज निर्माण केला. विनोबा भावे यांच्या भूदान चळवळीत भाग घेऊन ११ दिवसात ११ हजार एकर जमीन त्यांनी मिळवून दिला होती. पुणे येथील पानशेत धरण प्रलय, विदर्भातील पूर, नागपूर येथील हिंदूमुस्लिम दंगा, कोयना भूकंप अशा अनेक अटीतटीच्या वेळी ते सरकार बरोबर उभे राहिले. चीनने भारतावर १९६२ साली आक्रमण केले. त्या वेळी त्यानी संरक्षण निधी उभारण्यासाठी मोलाचे योगदान दिले. सैनिकी शाळांना प्रोत्साहन दिले. १९६५च्या भारत- पाक युद्धात सीमावर्ती भागात प्रत्यक्ष

जाऊन त्यांनी भारतीय सैनिकांना जोश दिला. विनोबा भावे यांच्या भूदान चळवळीत त्यांनी ११ दिवसात ११ हजार एकर जमीन मिळवून दिली होती. तुकडोजी महाराजांनी १९३५ साली मोझरी येथे सुरू केलेला गुरुकुंज आश्रम आज जणू एक विद्यापीठ बनला आहे. त्यानी लिहिलेली ग्रामगीता म्हणजे ग्राम विकासाचा धर्मग्रंथच होय. स्त्री सक्षमीकरण , अस्पृश्यता निर्मूलन , दुबळ्यांचं सबळीकरण यासाठीही ते आयुष्यभर झटत राहिले. अशा या थोर राष्ट्रभक्त , राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे १० नोव्हेंबर १९६८ रोजी देहावसान झाले. नागपूर येथील विद्यापिठास त्यांचे नाव देण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाने काही उपक्रमांना त्यांचे नाव दिले आहे. काळ जसजसा पुढे जात आहे, तसे त्यांचे विचार अधिकच पटत आहेत.

अशा या थोर 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराज' यांचं १० नोव्हेंबर १९६८ रोजी निधन झालं.

*( हा लेख लिहिण्यासाठी आवश्यक संदर्भ सुलभपणे उपलब्ध करून दिल्याबद्दल जेष्ठ शिक्षणतज्ज्ञ प्रा. डॉ. नरेशचंद्र काठोळे सर यांचे मनःपूर्वक आभार)*

# ज्ञानपुंज डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर



भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची भारतीय घटनेचे शिल्पकार म्हणून प्रामुख्याने ओळख होती. ही त्यांची ओळख अत्यंत मर्यादित स्वरूपाची आहे असे मला नेहमी वाटे. मुंबई दूरदर्शन केंद्रात कार्यरत असताना डॉ. बाबासाहेबांच्या जीवनातील अन्य विविध पैलूंवर प्रकाश टाकण्याची संधी मला मिळाली त्या अविस्मरणीय अनुभवांची ही एक आठवण.

त्याचं असं झालं की 1988 वर्षी मी तत्कालीन मराठवाडा विद्यापीठात मास्टर ऑफ मास कम्युनिकेशन अँड जर्नालिझम हा अभ्यासक्रम करण्यासाठी गेलो होतो. तेव्हा मी दूरदर्शनमध्ये करारपत्रित कलाकार स्टाफ आर्टिस्ट म्हणून कार्यरत असल्याने मला अध्ययन रजा मिळू शकली नाही जी नियमित शासकीय कर्मचाऱ्यांना मिळू शकते. म्हणून मी अन्य स्वरूपाची रजा घेऊन हा अभ्यासक्रम करण्यासाठी गेलो. अभ्यासक्रमाचे पहिले सत्र नोव्हेंबरमध्ये संपले. मी रजेवरून परत दूरदर्शनमध्ये रुजू झालो. त्याच वेळी माझे वरिष्ठ

अधिकारी निर्माते सुधीर पाटणकर यांच्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर आधारित हिंदी माहितीपट राष्ट्रीय प्रसारणासाठी बनविण्याची जबाबदारी केंद्राने सोपविली. बैठकीतून आल्यावर किती प्रचंड मोठी जबाबदारी सोपवली आहे हे पाटणकरांना कळून चुकले होते. त्यामुळे ते विचारमग्न झाले होते. ते कक्षात येताच मी त्यांना याविषयी विचारल्यावर त्यांनी कारण सांगितले. यावर मी त्यांना म्हणालो, तुम्ही मला दोन दिवसांचा वेळ द्या. पूर्ण विचार करून आपण काय ते ठरवू या!

त्या दोन दिवसात विचारांती माझ्या लक्षात आले की बाबासाहेबांची प्रामुख्याने ओळख आहे ती भारतीय घटनेचे शिल्पकार म्हणून. वस्तुतः याशिवाय ते विचारवंत, समाज सुधारक, शिक्षण प्रसारक, कामगार नेते, धर्मशास्त्र अभ्यासक, अर्थतज्ञ, संपादक अशा विविध भूमिकांतून प्रभावीपणे वावरलेले आहेत. या विविध पैलूंपैकी मला सर्वाधिक भावला तो म्हणजे शिक्षणाचा पैलु. खरे पाहता बाबासाहेबांनी स्वतः अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत उच्च शिक्षण घेतले होते. परदेशात जाऊन डॉक्टरेट मिळविली होती. या त्यांच्या उच्च शिक्षणामुळे त्यांना त्यांचे पुढचे जीवन आनंदात आणि आरामात घालविणे सहज शक्य होते. परंतु, शिक्षणाचे महत्त्व ओळखून त्यांनी देशबांधवांना शिक्षित करण्यासाठी शिक्षण प्रसारणाचे काम हाती घेतले.

औरंगाबाद येथे १९८८साली विद्यापीठात शिकत असताना जो मराठवाडा तेव्हाही आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक दृष्ट्या मागासलेला समजला जात असे , अशा मराठवाड्यात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी पीपल्स एज्युकेशन सोसायटीद्वारे १९४८ साली मिलिंद महाविद्यालय स्थापन केले. हे पाहून मला बाबासाहेबांविषयी अतोनात आदर वाटू लागला. अन्यथा त्या काळी मराठवाड्यातील तरुण-तरुणींना उच्च शिक्षण घ्यावयाचे असल्यास नागपूर, पुणे, मुंबई , हैदराबाद अशा दूरच्या ठिकाणी जावं लागायचं. इतक्या दूर जाऊन शिक्षण घेण्याची अनेकांची तेव्हा ऐपत नसायची. त्यामुळे मराठवाड्यातील हजारो तरुण उच्च

शिक्षणापासून वंचित राहत होते. त्यांच्या अडचणी ओळखून बाबासाहेबांनी औरंगाबाद येथे मराठवाड्यातील पहिले मिलिंद महाविद्यालय सुरू करून अत्यंत दूरदृष्टी दाखवली.

या महाविद्यालयामुळे मराठवाड्यात उच्च शिक्षणाची क्रांती झाली असे म्हटल्यास ते वावगे ठरणार नाही. म्हणूनच माहितीपटासाठी विषयाचा विचार करताना मला बाबासाहेबांच्या शैक्षणिक पैलूवरच संपूर्ण माहितीपट असावा, असे वाटू लागले. वरिष्ठांशी चर्चेअंती याच विषयावर माहितीपट करण्याचे निश्चित झाले. माहिती पटाचे स्वरूप विचारात घेता त्यासाठी सर्व तपशील संशोधनदृष्ट्या परिपूर्ण असणे गरजेचे होते. त्यासाठी संशोधनाचे काम प्राध्यापक गोविंद पानसरे यांना देण्यात आले. त्यांनी केलेल्या संशोधनावर आधारित संहिता लेखन प्राध्यापक रतनलाल सोनग्रा यांनी केले.

माहितीपटाच्या चित्रीकरणास आम्ही औरंगाबादला सुरुवात केली. चित्रीकरण पथकात निर्माते सुधीर पाटणकर, निर्मिती सहायक देवेंद्र भुजबळ, कॅमेरामन के. गणपती, ध्वनिमुद्रक किशोर जोशी, सहाय्यक ए के सारस यांचा समावेश होता. नागसेन वनातील मिलिंद महाविद्यालयाची वास्तू , तेथे उपलब्ध असलेली दुर्मीळ छायाचित्रे, बाबासाहेबांच्या विविध वस्तू, प्राचार्यांची आणि विद्यार्थ्यांची मनोगतं, तत्कालिन मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू प्राचार्य शिवाजीराव भोसले यांचे निवेदन , पुणे , महाड , मुंबई येथील शैक्षणिक वास्तूंचे चित्रीकरण व संकलन करून पुढे ६डिसेंबर१९८८ रोजी रात्री नऊ वाजता दूरदर्शनच्या राष्ट्रीय प्रसारणात हा माहितीपट प्रसारित झाला.

डॉक्टर बाबासाहेबांनी विद्यार्थिदशेत कसे शिक्षण घेतले, समाजाला शिक्षित करण्यासाठी कसे परिश्रम घेतले , शैक्षणिक संस्था कशा उभारल्या , त्यांना या कामी मिळालेले इतरांचे सहाय्य , त्यांची ग्रंथसंपदा, त्यांनी लिहिलेले ग्रंथ या सर्व महत्त्वाच्या शैक्षणिक बाबींचे दर्शन सुमारे तीस मिनिटाच्या या माहितीपटाद्वारे अत्यंत संवेदनशीलपणे दाखविण्यात आले. त्या वेळी दूरदर्शन ही एकमेव वाहिनी होती. रात्री नऊ ही वेळ प्राईम टाईम असायची. म्हणजेच

या वेळेत सर्वाधिक दर्शक दूरदर्शन पहात. या माहितीपटाविषयी देशातील विविध भागातून खूप भावपूर्ण प्रतिक्रिया आल्या. या माहितीपटामुळे बाबासाहेबांच्या एका पैलूचे थोडेफार का होईना दर्शन घडविण्याची आपल्याला संधी मिळाली याबद्दल मला नेहमीच समाधान वाटत आले. तसेच बाबासाहेबांचे जीवन आणि कार्य किती अचंबित करणारे आहे हेही लक्षात आले.

दरम्यान, मी भारत सरकारच्या दूरदर्शन सेवेतून महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या सेवेत ऑक्टोबर १९९१ रोजी अलिबाग येथे जिल्हा माहिती अधिकारी म्हणून रुजू झालो. जून १९९३ मध्ये माझी बदली मंत्रालयात झाली. दूरदर्शनचा पूर्वानुभव असल्याने माझ्याकडे जास्त करून तेच काम असे. डॉक्टर बाबासाहेबांच्या ऐतिहासिक , शैक्षणिक कार्याची नोंद घेऊन १४जानेवारी १९९४ रोजी मराठवाडा विद्यापीठाचा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असा नामविस्तार करण्यात आला. या नामविस्तारासाठी अनुकूल वातावरण निर्माण व्हावे यासाठी शासनाने प्रत्यक्ष निर्णय जाहीर करण्याच्या काही दिवस आधी विविध मान्यवरांची मनोगते दररोज मुंबई दूरदर्शन केंद्रावरून प्रसारित करण्याचं ठरविले. या मान्यवरांच्या मनोगतांचे चित्रीकरण, संकलन माहिती खात्यामार्फत होत असे. तर प्रसारण दूरदर्शनवरून संध्याकाळी बातम्यांचा आधी होत असे. त्या समन्वयाची जबाबदारी माझ्यावर होती. प्र. स. महाजन हे आमचे संचालक होते. तर दुरदर्शनकडून सहायक केंद्र संचालक वसंतराव भामरे हे प्रसारण विषयक काम पहात होते. पुढे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावासह डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असे नाव झाले. भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाला मिळालेली ही मानवंदनाच होय. या महामानवाला माझी मनःपूर्वक महावंदना.


# भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे कामगारकल्याणातील भरीव योगदान



जगभर १ मे हा कामगार दिन म्हणून पाळला जातो. तो साजरा केला जात नाही. याचं कारण म्हणजे अमेरिकेत १ मे १८८६ रोजी कामगार कल्याणासाठी फार मोठे आंदोलन झाले होते. कामाचे १६ तास कमी करून ते ८ तास करावेत, कामाच्या ठिकाणी सुरक्षेच्या योजना असाव्यात या प्रमुख मागण्या होत्या. या आंदोलनाच्या तिसऱ्या दिवशी आंदोलन समर्थक कामगार आणि आंदोलन विरोधी कामगार यांच्यात शिकागो येथील हेमार्केट चौकात हिंसक वळण लागले. बॉम्बस्फोट झाला. काहींना प्राण गमवावे लागले. शहिद कामगार यांच्याविषयी आदर प्रकट करण्यासाठी १ मे हा दिवस कामगार दिन म्हणून पाळावा, असे अमेरिकेतील कामगार संघटनांनी ठरविलं. पुढे हळूहळू जगातील इतर देशांमध्ये सुध्दा १ मे हा कामगार दिन म्हणून पाळला जाऊ लागला. बहुतेक देशांमध्ये या दिवशी सुट्टी देण्यात येते. विविध उपक्रम आयोजित करण्यात येतात. भारतात पहिला कामगार दिन मद्रास येथे (आताचे चेन्नई) १ मे १९२३ रोजी डाव्या विचार सरणीच्या किसान पार्टी ऑफ हिंदुस्थान या संघटनेनं कॉम्रेड मलयपूरम सिंघवेलू चेट्टीयार यांच्या नेतृत्वाखाली पाळला. या वेळी विविध प्रकारच्या मागण्या

मांडण्यात आल्या. त्यातील एक प्रमुख मागणी होती, ती म्हणजे कामाचे तास १६ वरून ८ करणे ही होय. प्रत्यक्षात ही मागणी मान्य व्हायला अनेक वर्षे लोटली. आणि याचं श्रेय आहे, ते भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना. कामगार नेते असलेल्या बाबासाहेबांची ब्रिटीश सरकारने व्हॉइसरॉय एक्सिकुटिव्ह कौन्सिलचे सदस्य म्हणून ७ जुलै १९४२ रोजी नेमणूक केली. तेव्हा पासून कामगार कल्याण विषयक अनेक कायदे, योजना बाबासाहेबांनी लागू केल्या. खरं म्हणजे हा सर्व आढावा या लेखात घेणं शक्य नाही, स्वतंत्र ग्रंथाचा तो विषय आहे. म्हणून इथे आपण निदान तोंड ओळख तरी करून घेऊ या. बाबासाहेबांनी केलेले कामगार कल्याण विषयक कायदे आणि योजनांची संख्या २५ पेक्षा जास्त आहे. यातील काही प्रमुख म्हणजे त्यांनी कामगारांचे कामाचे तास ८ केले. समान काम समान वेतन या तत्त्वानुसार स्त्री पुरुष यांच्या वेतनात समानता आणली. स्त्रियांना बाळंतपणाची रजा लागू केली. कामगार राज्य विमा योजना, आरोग्य योजना, कामगार कल्याण निधी, भविष्य निर्वाह निधी, कामगार संघटना मान्यता, किमान वेतन हमी, महागाई भत्ता, कामगारांना कौशल्य प्रशिक्षण, महिला व बाल कामगारांना संरक्षण मिळण्यासाठी कायदा, खाणीत काम करण्यास महिलांना बंदी, महिला कामगार कल्याण निधी, भर पगारी रजा, सेवा योजना कार्यालये, अशा अनेक बाबींचा समावेश आहे. बाबासाहेब केवळ कामगार नेतेच नव्हते तर निष्णात कायदेपंडित होते. इंग्लंड, अमेरिकेत उच्च शिक्षण घेतल्यामुळे त्यांचा तिकडील कामगार चळवळी, कायदे, योजना यांचा चांगला अभ्यास होता. कामगार कल्याणाची तळमळ, कायदे करण्याचे ज्ञान, मिळालेली संधी याचा त्यांनी सुरेख उपयोग करून देशातील कामगारांना कायमस्वरूपी लाभ मिळवून दिले. जवळपास ४ वर्षे म्हणजे १९४२ ते १९४६ अशी ४ वर्षांची त्यांची कारकीर्द देशातील कामगार कल्याणावर कायमचा ठसा उमटवून गेली. त्यांच्या या थोर कामगार कल्याण कार्यानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन.

# गुरुदेव रवींद्रनाथ टागोर




जन गण मन या आपल्या राष्ट्रगीताचा स्वर कानावर पडताच आपली मान अभिमानाने ताठ होते. जिथे असू तिथे आपण स्तब्ध होतो. असं हे आपलं थोर राष्ट्रगीत गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांच्या प्रतिभेतून साकारलं आहे. त्यांना वंदन करून थोडसं त्यांच्याविषयी जाणून घेऊ या...

पश्चिम बंगाल मधील कोलकता येथील पिराली ब्राह्मण कुटुंबात रवींद्रनाथ टागोर यांचा ७ मे १८६१ रोजी जन्म झाला. जन्मजात प्रतिभा लाभलेल्या रवींद्रनाथ यांनी वयाच्या आठव्या वर्षी पहिली कविता लिहिली. पुढे भानुसिंह या टोपणनावाने त्यानी काव्य लेखन केले. रवींद्रनाथ

यांच्या घराला उच्च शिक्षणाची परंपरा होती. त्यामुळे त्यांना बॅरिस्टर होण्यासाठी इंग्लंडमधील लंडनच्या युनिव्हर्सिटी कॉलेजमध्ये पाठविण्यात आले. परंतु कोणतीच पदवी न घेता ते १८८० साली भारतात परतले. चार भिंतीमधील शिक्षण माणसाला खरं घडवू शकत नाही, या विचारातून त्यांनी खुल्या हवेतील शांतिनिकेतनचा जगप्रसिद्ध अभिनव प्रयोग केला. रवींद्रनाथ केवळ कवी, गीतकार, साहित्यिक संगीतकार, चित्रकार, शिक्षणतज्ञ नव्हते तर ते थोर देशभक्त विचारवन्त होते. त्यांनी सुरू केलेले संगीत हे त्यांच्या नावाने म्हणजेच रवींद्र संगीत म्हणून ओळखल्या जाते. भारतीय संगीत, साहित्य यावर त्यांची अमीट छाप पडली आहे. "गीतांजली"च्या रचनेबद्दल त्यांना जगातील सर्वोच्च असा नोबल पुरस्कार १४ नोव्हे १९१३ रोजी देण्यात आला. हा पुरस्कार मिळालेले ते भारतातीलच नव्हे तर आशियातील पहिले विजेते आहेत. रवीन्द्रनाथांच्या कार्याची दखल घेऊन ब्रिटिश सरकारने त्यांना १९१५ साली "सर" ही पदवी देऊन त्यांचा बहुमान केला. १९१९ साली जालियनवाला बाग हत्याकांड झाले. या नृशंस हत्याकांडाचा निषेध म्हणून आपली सर पदवी त्यांनी ब्रिटिश सरकारला परत करून आपला स्वाभिमान आणि देशप्रेम प्रकट केले. भाषिक अस्मितेमुळे १९७१ मध्ये पाकिस्तानपासून स्वतंत्र झालेल्या बांगला देशने त्यांचे "आमार शोनार बांग्ला" हे गीत राष्ट्रगीत म्हणून स्वीकारले आहे. महाराष्ट्र आणि रवींद्रनाथ यांचा विशेष ऋणानुबंध आहे. आपल्या संत साहित्याने रवींद्रनाथ प्रभावित होते. संत तुकाराम महाराज यांचे अभंग त्यांनी बंगालीत अनुवादित केले आहेत. छत्रपती शिवाजी महाराज त्यांचे प्रेरणास्थान होते. महाराजांवर त्यांनी खंडकाव्य लिहीले आहे. रवींद्रनाथ यांच्यामुळे मराठीतील अनेक साहित्यिक प्रभावित झाले आहेत. रवींद्रनाथ यांनी चाकोरीबद्ध जीवनाला नवी दिशा दिली. जगात त्यांच्या विचारांचा मोठा प्रभाव आहे. अशी ही थोर विभूती ७ ऑगस्ट १९४१ रोजी अनंतात विलीन झाली. गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांना भावपूर्ण अभिवादन.

## बुद्धवंदन



नेपाळ सरकारने वर्ष २०२० हे पर्यटन वर्ष म्हणून घोषित केले आहे. यापूर्वी नोकरीत असताना माझं दोनदा नेपाळला जाणे ऐनवेळी रद्द करावे लागले होते.

त्यामुळे काही झाले तरी या वेळी नेपाळला जायचेच असा मी निश्चय केला होता. नेपाळला भेट देण्यासाठी मी पूर्वी नोकरी करत असलेल्या दूरदर्शनमधील मित्र निर्माता राम खाकाळ आणि नंतर महाराष्ट्र शासनाच्या नोकरीत मित्र झालेले अवर सचिव बी एस गायकवाड असं आमचं त्रिकुट जमलं. बजेट प्रमाणे ट्रॅव्हल एजन्सी बघितली. नेपाळमध्ये धार्मिक व पर्यटन स्थळे खूप आहेत. गौतम बुद्ध यांचं लुम्बिनी हे जन्म स्थान नेपाळमध्येच आहे. देश विदेशातून बुद्ध धर्माचे भिख्खू, अनुयायी, श्रद्धाळू दररोज तिथे हजारोंच्या संख्येने

येत असतात. नेपाळ सरकारने हे स्थान अतिशय सुंदर ठेवले आहे. शिवाय विविध देशातील सरकारांनी, संस्थांनी या स्थानाच्या सौंदर्यात भर घातली आहे. इथल्या प्रसन्न वातावरणात दिवस कसा जातो, हे कळत नाही. लुम्बिनी येथे इस. पूर्व ५६३ ला वैशाख पौर्णिमेला, कपीलवस्तू नगरीचे शुद्धोदन राजा व महामाया राणीच्या पोटी सिद्धार्थ राजकुमारचा जन्म झाला.

वयाच्या २९ व्या वर्षी सिद्धार्थाने गृहत्याग केला. प्रचलित शारीरिक यातनामय साधना पद्धतींचा सहा वर्षे अवलंब केला. याने दु:खमुक्ती ऐवजी शरीर मुक्तीचा अंतिम टप्पा गाठला. इच्छित फलप्राप्तीऐवजी मरणासन्न अवस्था प्राप्त झाली. सिद्धार्थचा राजबिंडा देह हाडांचा सापळा झाला. सिद्धार्थने सुजाताची खीर खाऊन साधना पद्धतीत बदल केला. ऐषोआरामाचे टोक व शरीर यातनेचे टोक या दोन्हींचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. मध्यम मार्ग निवडला. बुद्ध गयेला पिंपळ वृक्षाखाली ई, स, पूर्व ५२८ला, वैशाख पौर्णिमा दिनी, सिद्धार्थ बुद्ध झाला. सर्व ब्रम्हांड चारही ब्रम्ह विहारांनी आनंदाने न्हाऊन निघाले. गौतम बुद्धानी ४५ वर्षे सतत पायी प्रवास करत सद्धम्माचा प्रचार केला. ज्ञान प्राप्तीनंतर सारनाथ येथील मृगदाय वनात पंचवर्गीय भिक्षूंना प्रथम प्रवचन दिले. हे प्रवचन "धम्मचक्क पवत्तन" अर्थात धम्मचक्र प्रवर्तन, या नावाने इतिहासात प्रसिद्ध आहे. "बहुजन हिताय, बहुजन सुखाय" करिता, सर्वांच्या दु:खमुक्तीकरिता ते प्रचार करीत राहिले. वयाच्या ८०व्या वर्षी ते कुशीनगर येथे आले. येथेच दोन शाल वृक्षांच्या मधे त्यांनी देह त्यागला व महापरिनिर्वाण पदास ते गेले.

जन्म, ज्ञानप्राप्ती, महापरिनिर्वाण या तीन घटना वैशाख पौर्णिमेला घडून येणे, हे केवळ बुद्धांविषयीच घडले. हे तिन्ही प्रसंग पावन प्रसंग. म्हणूनच याला त्रिविध पावन पौर्णिमा असे म्हणतात.

बुद्धाने या पृथ्वीवर धर्माच्या नावाखाली ज्या जुन्या परंपरा प्रचलित होत्या, त्या स्वीकारल्या नाहीत. नवीन धम्म सांगितला. नवीन इतिहास निर्माण केला.

"अत्थाहि अत्थनो नाथो, कोहि नाथो परोसिया" अर्थात मनुष्य स्वतःच स्वतःचा स्वामी त्याचा इतर कोणीही इश्वर नाही, असा स्वयंप्रकाशित बनण्याचा उपदेश केला.

विज्ञानाच्या कसोटीवर आधारित सिद्धांत म्हणजे, "कार्यकारणभाव"! अर्थात कारणाशिवाय काहीही न घडणे. या सिद्धांतामुळे शाश्वतता वादावर आपोआपच पडदा पडला. त्यांनी सांगितले की, सर्व अनित्य आहे. सर्व बदलणारे आहे. हाच निसर्ग नियम आहे.

जगात दु:ख आहे हे पूर्वी काहीजण सांगत होते; परंतु दु:खातून मुक्त कसे व्हायचे, याचे उत्तर कोणाकडेच नव्हते. तेच उत्तर भगवान बुद्धाने शोधून काढले. या महान कल्याणकारी दिव्य ज्ञानाचा शोध सम्यक सम्बुद्धाने वैशाख पौर्णिमेला लावला. त्या जीवनमुक्त करणाऱ्या मार्गाला "आर्य अष्टांगिक मार्ग" असे म्हणतात. या मार्गाद्वारे शीलावर अधिष्ठीत होणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला दु:खमुक्त होता येते. यालाच काही लोक मुक्ती, मोक्ष म्हणतात. भगवान बुद्धाने याला "निर्वाण" म्हटले आहे. ते म्हणतात, "निब्बाणं परमं सुखं", निर्वाण हे सर्व श्रेष्ठ सुख आहे. काही लोक, निर्वाण म्हणजे मृत्यू असा चुकीचा अर्थ काढतात. निर्वाण ही सर्व श्रेष्ठ सुखाची परमोच्च अवस्था आहे. भगवान बुद्ध यांनी सांगितलेली विपश्यना मी सपत्नीक नाशिक जिल्ह्यातील धम्मगिरी येथे दहा दिवस राहून केली आहे. जगात मानसिक ताण, तणाव वाढत असताना नियमित विपश्यना खूप आवश्यक आहे.

जगात भारत, नेपाळ, ब्रह्मदेश, चीन, जपान, श्रीलंका, थायलँड आदी देशात बौद्ध धर्माचा विशेष प्रसार झाला आहे. भारतातील अजिंठा, वेरूळ लेणी, ब्रह्मदेश, चीन , थायलँड मधील अनेक प्रसिद्ध बुद्ध विहार पहायची संधी मला मिळाली, हे मी माझं भाग्य समजतो. विश्व शांतीचा संदेश देणारे गौतम बुद्ध यांना मनोभावे वंदन.

# दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर



मराठी वृत्तपत्र सृष्टीचे जनक बाळशास्त्री जांभेकर यांची १७ मे ही पुण्यतिथी आहे. मराठी भाषेतील "दर्पण" हे वृत्तपत्र त्यांनी ६ जानेवारी १८३२ रोजी प्रकाशित केले होते. हा दिवस दरवर्षी महाराष्ट्रात पत्रकार दिन म्हणून साजरा करण्यात येतो. महाराष्ट्र शासनातर्फे त्यांच्या नावाने सर्वोच्च उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार देण्यात येतो. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पोंभुरले या त्यांच्या गावी भव्य स्मारकही उभारण्यात येत आहे. अष्टपैलू व्यक्तिमत्त्व लाभलेल्या या थोर देशभक्ताविषयी जाणून घेऊ या.

भारतात इंग्रजांच्या आगमनानंतर आधुनिक शास्त्रांशी नाते जुळलेली विद्वानांची पहिली पिढी पुढे आली. त्या पिढीचेच प्रतिनिधित्व बाळशास्त्री जांभेकर करत होते.

ज्ञानाच्या अनेक शाखा अनेक भाषांतून अवगत आहेत आणि मानवाच्या भौतिक प्रगतीसाठी या ज्ञानाने संपन्न होणे गरजेचे आहे; हे त्या पिढीला उमगू लागले होते. इंग्रजीचा

प्रसार हा फक्त राज्यकर्त्यांच्या माध्यमातूनच होत नव्हता तर तो ख्रिस्ती धर्म प्रसारकांच्या माध्यमातूनही होत होता. त्यामुळे ख्रिस्ती धर्माचे गुणगान गाताना येथील समाज, त्यातील बऱ्या वाईट चालीरिती आणि अनिष्ट समजुती आणि प्रथा यावर होणारे हल्ले या नवशिक्षितांच्या दृष्टीस येत होते. दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर हे महाराष्ट्रातील पारंपरिक विचारांच्या पलीकडे जाऊन नव्याने विचार करणाऱ्या पहिल्या पिढीचे प्रतिनिधी होते.

बाळशास्त्री जांभेकरांचा जन्म कोकणातील देवगड जवळील पोंभुर्ले या गावी १८१२ साली झाला. वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षी ते आधुनिक शिक्षणासाठी मुंबईत आले. त्यांनी इंग्रजीचा अभ्यास सुरू केला. बाळशास्त्रींना एकूण ९ भाषा अवगत होत्या. अवघ्या १८ व्या वर्षी बापूशास्त्री छत्रे यांच्या आश्रयाने त्यांनी विद्याभ्यास पूर्ण केला. बाळशास्त्रींची हिंदवी शाळा पुस्तक मंडळाचे भारतीय सचिव म्हणून नेमणूक झाली. वयाच्या अवघ्या १९व्या वर्षी म्हणजेच १८३१ साली त्यांनी ग्रंथ लेखनास आरंभ केला. वयाच्या २०व्या वर्षीच मराठी वृत्तपत्र सृष्टीची मुहूर्तमेढ रोवणारे "दर्पण" वृत्तपत्र सुरू केले.


बाळशास्त्रींना बंगालीही अवगत असल्याने त्यांच्यावर बंगालमधील सामाजिक चळवळींचा प्रभाव होता. दर्पण हे तसे द्विभाषिक वृत्तपत्र होते. त्यात मराठी मजकूर असला तरी त्याच्या शेजारी इंग्रजीतही मजकूर प्रकाशित होत असे. सुरूवातीस पाक्षिक स्वरूपात प्रकाशित होणारे हे वृत्तपत्र वाचकांच्या आग्रहामुळे चारच महिन्यांत साप्ताहिक झाले आणि दर आठवड्यास प्रकाशित होऊ लागले.

दर्पण नाव निवडण्यामागे बंगालमध्ये प्रकाशित होणाऱ्या समाचार दर्पण चा प्रभाव असण्याची शक्यता आहे. दर्पणचा उद्देश पाश्चात्त्य विचाराची गोडी मराठी समाजास लागावी, समृद्धी आणि स्वकल्याण यासंबंधी विचार करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध व्हावे, सामाजिक सुधारणांवर विचारमंथन व्हावे हा होता.

सामाजिक सुधारणांसंबंधी आग्रही असलेले दर्पण वाचकांचे स्वातंत्र्यही तेवढेच महत्त्वाचे मानत असे. त्यामुळे संपादकीय धोरण आणि विचार या विरोधातील मतांनाही त्यात योग्य स्थान मिळत होते. संपादकीय चुकांबद्दल दिलगिरी व्यक्त करण्याचे मोठेपणही दर्पणकारांकडे होते, हे त्याचे लक्षणीय वैशिष्ट्य होते. इंग्रजी विद्यांचा विचार करताना भारतीय विद्या आणि विद्वत्तेचा रास्त अभिमानही दर्पण बाळगत होते. बुद्धिमत्ता आणि विचारशक्ती ही इंग्रजांची मक्तेदारी नाही, यावर दर्पणकारांचा विश्वास होता. दर्पणचा खप त्या काळात ३००प्रतींच्या जवळपास होता.

१८४०मध्ये मराठी साक्षरांमध्ये लोकप्रिय झालेले दर्पण अनाकलनियरित्या बंद करण्यात येऊन युनायटेड सर्व्हिस गॅझेटमध्ये विलीन करण्यात आले. उण्यापुऱ्या ८ वर्षांत आपली छाप उठवून दर्पण अंतर्धान पावले. पाठोपाठ १७ मे १८४६ रोजी दर्पणकारांचे निधन झाले. अल्पायुषी असूनही त्यांनी केलेले कार्य आजही आपल्याला दिशा देत आहे, यावरूनच त्यांची थोरवी दिसून येते. अशा या थोर देश भक्तास, मराठी वृत्तपत्र सृष्टीच्या जनकास भावपूर्ण श्रद्धांजली.

# स्वातंत्र्यवीर सावरकरांचे सामाजिक समतेसाठी अमूल्य योगदान



स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा जन्म दिनांक २८ मे१८८३ रोजी नाशिक जिल्ह्यातील भगूर येथे एका श्रीमंत घराण्यात झाला. तर त्यांचे आत्मार्पण दिनांक २६ फेब्रुवारी१९६६ रोजी मुंबईत झाले. जससजा काळ पुढे जात आहे, तसतसे त्यांचे विचार, कार्य यांची गरज आपल्याला तीव्रतेने जाणवत आहे. यामुळेच देशविदेशात सावरकर सम्मेलन आयोजित करण्यात आले होते. ही अत्यंत आवश्यक, अभिमानाची बाब आहे.

सावरकर राष्ट्रीय प्रतिष्टानतर्फे २६ -२७ फेब्रुवारी २०२० असे दोन दिवसाचे सावरकर सम्मेलन नवी दिल्ली येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय सभागृहात आयोजित करण्यात आले होते. दोन दिवसात विविध विषयांवर विचार मंथन झाले. या निमित्ताने मला " स्वातंत्र्यवीर सावरकरांनी सामाजिक समतेची दिलेले योगदान आणि त्याचे आजचे महत्त्व " या विशेष पैलूंवर बोलायची संधी मिळाली. ब्रिटीश सरकारने क्रांतिवीर मदनलाल धिंग्रा यांना दिलेल्या फाशीच्या शिक्षेचा सूड घेण्यासाठी अनंत कान्हेरे या निधड्या छातीच्या तरुणाने नाशिकचा कलेक्टर ए एम टी जॅक्सन याला २१ डिसेंबर १९०९ रोजी गोळी घालून ठार मारले. या प्रकरणात सावरकरांवर ३८ दोषारोप ठेवून त्याना जन्मठेप झाली. ४ जुलै१९११ पासून

सावरकरांची अंदमान कारागृहात शिक्षा सुरू झाली. कारागृहात त्यांचा अनन्वित छळ सुरू झाला. तरी गप्प बसतील, ते सावरकर कसले? तेथेही त्यांनी आपले कार्य सुरू केले.

**साक्षरता प्रसार**: कैद्यांमधील अज्ञान पाहून सावरकरांना त्यांना साक्षर करणे महत्त्वाचे वाटू लागले. त्यामुळे सावरकरांनी तुरुंगात साक्षरतेचे कार्य हाती घेतले. यामुळे अनेक कैदी साक्षर झाले. त्यांना कारकुनाच्या जागा मिळू लागल्या. अक्षरज्ञान करून घेतल्यामुळे जेव्हा कैद्यांना वृत्तपत्र वाचता येऊ लागले, तेव्हा त्यांचा आनंद गगनात मावेना. साक्षरतेबरोबरच सावरकरांनी कारागृहात ग्रंथालय उभारणीचे कार्य हाती घेतले. जेव्हा त्यांनी अंदमान सोडले, तेव्हा तिथे दोन हजार ग्रंथ जमा झाले होते!.

**कारागृहातून पत्रकारिता**: कारागृहात शारीरिक, मानसिक कष्ट, हाल अपेष्टा, अतोनात छळ होऊनही सावरकर खचले नाहीत. अशाही परिस्थितीत त्यांनी गुप्तपणे पत्रकारिता सुरूच ठेवली. क्रांतिकारक इंदूभूषण व उल्लास्कर यांचा छळ आणि हौतात्म्य याविषयीचे थरारक वृत्तांत भारतीय वृत्तपत्रांमधून त्यांनी प्रसिद्ध केले. त्यामुळे इंग्रज अधिकारी हादरले. वृत्तपत्रातून झालेली टिका, मध्यवर्ती मंडळात विचारले गेलेले प्रश्न, लोकमताचे वाढते दडपण, या सर्वांचा सरकारवर दबाव आला. शेवटी १९१३साली सर रेजिनाल्ड क्रडॉल यांनी अंदमानला भेट दिली. प्रत्यक्ष पाहणी केली. ते कैद्यांशी बोलले. त्यांनी सावरकरांची भेट घेतली. या सर्वांचा परिणाम होऊन अंदमानच्या यमपुरीतील छळ आणि निर्बंध किंचितसे सैल झाले.

**अस्पृश्यता निर्मूलन**: अंदमान कारागृहातून सावरकरांना रत्नागिरी कारागृहात हलविण्यात आले. हिंदू जातिव्यवस्थेमुळे एक होऊ शकत नाही, हे सावरकरांनी ओळखले होते. त्यामुळे त्यांनी अस्पृश्यता निर्मुलना, जातिप्रथा निर्मूलन यासाठी सतत प्रयत्न केले. त्यांनी विविध कार्यक्रम हाती घेतले. २२फेब्रुवारी१९३१ रोजी सर्वांना खुले असणाऱ्या रत्नागिरीतील पतितपावन मंदिराचे उद्घाटन झाले. आचार्य, शंकराचार्य, पंडित, देशभक्त यांनी जाहीर केले की, रत्नागिरी हे एक तीर्थक्षेत्र बनले आहे. एक वक्ते म्हणाले, रत्नागिरी ही नवजागृत, शुद्धिकृत,


एकीकृत हिंदू जगताची नवी काशी ठरली आहे. ब्राह्मणांनी या उपाध्याय, प्रवचनकारांना हार घालून नमस्कार केले. एका ब्राह्मण तरुणाने अखिल हिंदू उपाहारगृह चालविले होते. खरोखरच पतितपावन मंदिर हे अखिल भारतीय हिंदू चळवळीचे विद्यापीठ बनले होते.

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या "जनता" पत्राने सावरकरांनी केलेल्या उपदेशाला पाठिंबा दिला. त्याआधी काही दिवस सावरकरांनी एक पत्रक काढून, डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या अनुयायांनी नासिक येथे चालविलेल्या मंदिर प्रवेशाच्या सत्याग्रहाला आपला पाठिंबा जाहीर केला होता. "दलित वर्गाच्या हिंदूंना काळाराम मंदिर उघडे करा"अशी नासिकच्या सवर्ण हिंदूंना सावरकरांनी त्या पत्रकाद्वारे विनंती केली होती. भाऊराव गायकवाड यांनी नासिकच्या सवर्ण हिंदूंमध्ये ते पत्रक वाटले होते. मी जर आज मोकळा असतो तर नासिकच्या सत्याग्रहात भाग घेऊन आधी पहिल्या प्रथम तुरुंगात गेलो असतो. " असे उद्गार सावरकरांनी काढले होते.

**विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन**: सावरकरांचा दृष्टिकोन सम्पूर्णतः आधुनिक, विज्ञाननिष्ठ होता. मानवाला जे साधक ते चांगले आणि जे बाधक ते वाईट, अशी त्यांची विचारसरणी होती. यंत्र हा शाप नसून मानवाला मिळालेले ते वरदान आहे, बेकारी हा यंत्राचा दोष नसून तो विषम वाटणीचा आहे, असे प्रतिपादन सावरकर कटाक्षाने करीत. एका लेखात सावरकरांनी निरीश्वरवादी रशियाच्या अंतराळ प्रगतीचे वर्णन करून विज्ञानाची कास धरण्याचे कळकळीचे आवाहन हिंदूना केले आहे. मानव अहितासाठी नव्हे तर मानव हितासाठी विज्ञानाचा उपयोग करण्याचे उद्दिष्ट मनुष्याने ठेवले तर विज्ञान हे वरदान ठरेल, असा निष्कर्ष त्यांनी काढला होता.

**लिपी सुधारणा**: लिपी सुधारणा, पंचांग सुधारणा याहीकडे सावरकरांनी लक्ष दिले होते. या विषयांवर त्यांनी अनेक लेख लिहिले, पुस्तके प्रकाशित केली. सावरकरांनी छापखान्यातील नागरी टंक २५०वरून ८०वर आणुन दाखविले. ही सर्वाधिक शास्त्रीय लिपी आहे, असे मुंबईच्या एका सभेत त्यांनी स्पष्ट केले. राष्ट्रीय पंचांग आवश्यकता या विषयावर त्यांनी केसरी


वृत्तपत्रात दोन लेख लिहिले होते. सावरकरांनी अनेक इंग्रजी शब्दांना समर्पक मराठी शब्द सुचविले आणि ते प्रचारात आणले. हे सर्व शब्द आज रूढ झाले आहेत. त्यातील काही शब्द म्हणजे, "मेयर"ला महापौर, "बजेट'ला अर्थसंकल्प, "टेलीप्रिंटर"ला दूरमुद्रक इत्यादि.




**आत्मार्पण**: १९६६च्या प्रारंभी सावरकरांची प्रकृती विकोपाला गेली. त्यांनी औषध घेणे सोडले. पचनक्रिया बिघडल्याने अन्न वर्ज्य केले. आधार घेऊन ते उठू शकत. त्यांना वेदना सहन होत नव्हत्या. मृत्यू केव्हा येईल, असे त्यांना झाले. एका लेखात , त्यांच्या दृष्टीसमोर तरळणाऱ्या अंतकाळाची सूचक कल्पना त्यांनी मांडली. ते म्हणतात, अत्यंत असमाधानाने, विफलतेच्या तीव्र जाणिवेने, संकटाना कंटाळून, इच्छा असतानाही सुखाने जगता येत नाही म्हणून, अत्यंत अतृप्त अशा मनःस्थितीत, वैतागाच्या भरात बळाने जे जीव देतात, त्यांच्या त्या कृत्याला साधारणत: "आत्महत्या" म्हटले जाते.

पण जे आपले जीवितकार्य सफल झाल्याने, आपल्या ऐहिक अस्तित्वाची हर्षभराने समाप्ती करतात, त्यांच्या या कृत्यास "आत्मार्पण " म्हणतात. सावरकरांनी आपल्या विचारांना जागून आत्मार्पण करण्याचा निर्धार केला. ३फेब्रुवारी१९६६ रोजी त्यांनी उपोषण सुरू केले. ते २३ दिवस चालले. शेवटी २६ फेब्रुवारी१९६६रोजी सकाळी ११ वाजता, वयाच्या ८३व्या वर्षी या खऱ्या स्वातंत्र्यवीराने आपला देह मृत्यूला अर्पण केला. भारतमातेच्या या महान, कणखर, प्रखर सुपुत्रास शतशः नमन.

# लोकशाहीर अण्णा भाऊ साठे: उत्तुंग प्रतिभेचा आविष्कार




लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचं हे जन्मशताब्दी वर्ष आहे. त्यानिमित्ताने त्यांच्या गौरवार्थ शाहीर हिंगे लोककला प्रबोधिनीच्या वतीने विशेषांक प्रकाशित होत आहे, ही अत्यंत समयोचित बाब आहे. त्यांच्या अभूतपूर्व प्रतिभेचा हा थोडक्यात आलेख....

सांगली जिल्ह्यातील वाटेगाव इथं १ ऑगस्ट १९२० रोजी तुकाराम भाऊराव साठे उर्फ अण्णा भाऊ साठे यांचा एका दलित कुटुंबात जन्म झाला. चौथीपर्यंत त्यांचं शिक्षण झालं. गावी दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली. त्यामुळे त्यांना उपजीविकेसाठी गाव सोडावं लागलं. मजल दरमजल करीत त्यांनी पायीं पायी मुंबई गाठली. मुंबईत आल्यावर त्यांनी पडेल ती कामं केली. समाजातील विषमता त्यांना अस्वस्थ करीत होती. यातूनच ते शाहिरीकडे वळले. तसे त्यांच्या घरात लोककलेची परंपरा होती. प्रारंभी त्यांच्यावर कम्युनिस्ट विचारसरणीचा प्रभाव पडला. ते कम्युनिस्ट पक्षाच्या लालबावटा कला पथकाचे सदस्य झाले. या पथकात त्यांच्यासोबत शाहीर दत्ता गवाणकर, शाहीर अमरशेखसुद्धा होते. या पथकाने जागोजागी जनजागरण केले.

पुढे मात्र ते डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी प्रेरित होऊन आंबेडकरी चळवळीत दाखल झाले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतही ते अग्रेसर होते. अण्णा भाऊ ज्या परिस्थितीत जन्मले, वाढले, जे जीवन ते जगले याचा त्यांच्या लेखणीवर अमीट परिणाम झाला. त्यांची फकिरा ही कादंबरी त्यांच्या जीवनमूल्याची साक्ष आहे. ब्रिटिशांच्या आणि समाजातील अनिष्ट चालीरितींविरुद्ध बंड करणाऱ्या तरुणाची ही कथा आहे. या कादंबरीला राज्य शासनाचा उत्कृष्ट वांड्मय पुरस्कार मिळाला. अण्णाभाऊंनी ३५ कादंबऱ्या लिहिल्या आहेत. त्यांच्या कथांचे १५ संग्रह प्रकाशित झाले आहेत. १२ चित्रपटांच्या पटकथा त्यांनी लिहिलेल्या आहेत. रशियाला जाऊन आल्यावर त्यांनी रशियाचं प्रवास वर्णन लिहिले आहे. भारतातील अनेक तसेच २७ परकीय भाषांमध्ये त्यांचं साहित्य अनुवादित झालं आहे, यावरूनच त्यांच्या साहित्याची थोरवी स्पष्ट होते. भारतात अभिनव ठरलेल्या महाराष्ट्रातील दलित साहित्याचे त्यांना जनक समजल्या जाते. १९५८ साली मुंबईत भरलेल्या पहिल्या दलित साहित्य संमेलनात त्यांनी "पृथ्वी ही शेषाच्या शिरावर नसून ती दलित आणि श्रमिकांच्या शिरावर उभी आहे, " असे ठणकावून सांगितले. "मुंबईची लावणी", "मुंबईचा गिरणी कामगार" या त्यांच्या प्रखर गीतांमधून मुंबईतील , पर्यायाने समाजातील विषमतेवर प्रहार केले आहेत. "जग बदल घालुनी घाव, सांगूनी गेले मला भीमराव" या त्यांच्या ओळी आजच्या पिढीलाही प्रेरणा देत आहेत. १८जुलै १९६९ रोजी त्यांचा मृत्यू झाला. अवघे ४८ वर्षांचं आयुष्य त्यांना लाभलं. पण एव्हड्या अल्प काळात त्यांनी निर्माण केलेलं अफाट साहित्य म्हणजे त्यांच्यातील प्रतिभेचा उत्तुंग आविष्कार आहे. महाराष्ट्र शासनाने त्यांच्या नावाने १९८५ साली अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ स्थापन केले. भारत सरकारने १ ऑगस्ट २००२ रोजी टपाल तिकीट प्रकाशित केले. पुणे येथे त्यांचे स्मारक आहे. तर मुंबईत कुर्ला येथील उड्डाण पुलाला त्यांचे नाव देण्यात आले आहे. अशा या महान प्रतिभावंताला विनम्र अभिवादन.

# साने गुरुजींची शाळा



साने गुरुजींची ११ जून २०२० रोजी ७० वी पुण्यतिथी झाली. २४ डिसेंबर १८९९ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील पालगड येथे जन्मलेल्या साने गुरुजींच्या लेखणीचा प्रभाव आजही कायम आहे. साने गुरुजींनी लिहिलेले "श्यामची आई" हे अजरामर पुस्तक शाळेत असताना मी वाचलं होतं. त्यानंतर ते कितीदा वाचलं, याची गणतीच नाही. तेव्हापासून। " श्यामची आई" आणि या पुस्तकाचे लेखक पूज्य साने गुरुजी यांनी माझ्या मनात कायमचं घर केलं. साने गुरुजी जळगाव जिल्ह्यातील अमळनेर येथील प्रताप हायस्कूलमध्ये काही वर्षे शिक्षक होते, तिथे शिकवत असतानाच त्यांनी आपल्या देशाच्या , भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात उडी घेतली होती, हे वाचून माहिती होतं, त्यामुळे या शाळेला भेट देण्याची माझी फार वर्षांपासून इच्छा होती. ती फलद्रूप झाल्याचा मला विलक्षण आनंद आहे. या शतकोत्तर शाळेचा इतिहास अत्यन्त देदीप्यमान आहे. पारतंत्र्यात असलेल्या आपल्या देशातील तरुणांमध्ये स्वातंत्र्यप्रियता , निर्भयता , निर्माण व्हावी,

त्यांना राष्ट्रीय शिक्षण मिळावे म्हणून विष्णुशास्त्री चिपळूणकर, लोकमान्य टिळक, समाज सुधारक गोपाळ गणेश आगरकर या तिघांनी आणि त्यांच्या इतर सहकाऱ्यांनी पुणे येथे १८८४ साली डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या पावलावर पाऊल टाकत खानदेशातील पहिलीच असलेली, खानदेश एज्युकेशन सोसायटी अमळनेर येथे स्थापन करण्यात आली. कै. अण्णासाहेब म्हसकर, बाळूकाका भागवत, भिडे वकील यांच्या सहकार्याने १७ जुलै १९०८ रोजी माळ्याच्या मढीत शाळा सुरू झाली. पूर्व आणि पश्चिम खांदेशच्या मध्यावर अमळनेर असल्याने दोन्ही बाजूचे विद्यार्थी शाळेत दाखल होऊ लागले. त्याच सुमारास राष्ट्रीय विचारांनी भारलेले वासुदेव महादेव भावे गुरुजी नोकरीच्या शोधात धुळे येथे आले होते. तेथे अमळनेर येथील द. वा. ब्रह्मे यांच्याशी त्यांची भेट झाली. अमळनेरला शिक्षणाची फारशी सोय नाही, तिथे तुम्ही याल का? अशी विचारणा ब्रह्मे यांनी भावे गुरुजींना केली. भावे गुरुजींनी होकार दिला आणि ते अमळनेरला आले. पुढे ज. ग. गुणे, जांभेकर, नवाथे, ह. कृ. मोहनी, साने गुरुजी, वाड, जठार आदी धध्येयवादी शिक्षकांची मांदियाळी शाळेस लाभली. श्रीमंत प्रताप शेठ यांचा वरदहस्त लाभल्याने शाळेच्या स्वतंत्र इमारती उभ्या राहिल्या. पांडुरंग सदाशिव साने उर्फ साने गुरुजी १९२४ साली या शाळेत शिक्षक म्हणून रुजू झाले. ते मराठी आणि इतिहास विषय शिकवत. शाळेच्या छात्रालयातच ते रहात. अल्पावधीतच ते विद्यार्थिप्रिय झाले. उनाड, बेशिस्त विद्यार्थ्यांना शिक्षा करण्याची त्यांची अनोखी पध्दत असे. ती म्हणजे त्या विद्यार्थ्यांना शिक्षा न करता ते स्वतःलाच शिक्षा करून घेत. साने गुरुजींच्या वर्गात एक उनाड , श्रीमंत विद्यार्थी होता. तो वर्गात सर्वांना त्रास देत असे, इतरांवर थुंकत असे. गुरुजींनी त्याला प्रेमाने नीट वागण्याविषयी अनेकदा सांगितले. तरीही तो ऐकेना. मग एके दिवशी गुरुजींनी वर्गाच्या मॉनिटरला शाळेच्या कार्यालयातून छडी आणण्यास सांगितले. हे पाहुन विद्यार्थ्यांना खूप आश्चर्य वाटलं. कारण कुणालाही शिक्षा करणं हे गुरुजींच्या स्वभावात नव्हतं. छडी आणण्यात आली. गुरुजी आता त्या विद्यार्थ्यास बेदम मारतील म्हणून सर्व विद्यार्थी बघू लागले, तर काय आश्चर्य! त्या विद्यार्थ्यास छडी मारण्याऐवजी गुरुजी

आपल्याच हातावर सपासप छड्या मारू लागले. हे पाहून तो उनाड विद्यार्थी रडू लागला. त्याने गुरुजींचे पाय धरले, क्षमा मागितली आणि पुढे कधीच चुकीचे न वागण्याचे वचन दिले.

छात्रालयात एकदा बोलण्याच्या ओघात एका विद्यार्थ्यांने गुरुजींना अमुक एक विद्यार्थी सिगारेट ओढतो असे सांगितले. हे ऐकून गुरुजी अतिशय खिन्न झाले. त्यानंतर गुरुजी दोन दिवस गप्पगप्पच होते. गुरुजी त्या वेळी स्वतः पहाटे चार ते पाच या वेळेत विद्यार्थ्यांसाठी हस्तलिखित वार्तापत्र तयार करून ते वार्ताफलकावर लावत. तीन दिवसांनंतरच्या हस्तलिखितात त्या विद्यार्थ्यांच्या व्यसनाबद्दल दुःख व्यक्त करून , माझा विद्यार्थी व्यसनी झाला, हा माझा अपराध आहे, म्हणून मला कोणी तरी शिक्षा करा रे! असे आर्त शब्द त्यांनी लिहिले. याचा व्हायचा तोच योग्य परिणाम झाला. त्या व्यसनी विद्यार्थ्यांने गुरुजींची माफी मागितली आणि तो व्यसनापासून दूर झाला. भारतीय संस्कृतीतील आत्मक्लेश या उच्च तत्त्वाचे गुरुजी विद्यार्थ्यांना असे दर्शन घडवत.

साने गुरुजींचे शाळेतील आणि छात्रालयातील विद्यार्थ्यांवर बारीक लक्ष असे. विद्यार्थ्यांनी अंधश्रद्धा जोपासु नये म्हणून ते दक्ष असत. छात्रालयातील काही विद्यार्थी अंधश्रद्धाळू आहेत, हे त्यांना कळाले. परीक्षेत चांगले गुण मिळावे म्हणून हे विद्यार्थी दर शनिवारी एका मंदिरात जात असत. एकदा या विद्यार्थ्यांना त्यांनी वाटेत अडवून सांगितले, अरे, देवाला साकडे घातल्याने देव प्रसन्न तर होत नाहीच उलट आपण आपला मौल्यवान वेळ व्यर्थ घालवतो. आपण आपलं कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडल्यास देवाचे आशीर्वाद मिळतील असे सांगून तो वेळ अभ्यासात घालवावा, असे त्यांना समजावून सांगितले.

देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात सहभागी होण्याच्या महात्मा गांधी यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत साने गुरुजींनी २९ एप्रिल १९३० रोजी शाळा सोडली. ते पूर्णपणे स्वातंत्र्य लढ्यात उतरले. छात्रालयातील ज्या खोलीत गुरुजी रहात तिथे संस्थेने साने गुरुजी स्मृतिकक्ष उभारला आहे. या कक्षात त्यांची दैनंदिनी, अन्य साहित्य, त्यांचं जीवन दर्शन घडविणारं सुंदर प्रदर्शन आहे.

या शाळेचा १० जुलै १९३४ रोजी रौप्य महोत्सव तत्कालीन उपराष्ट्रपतींच्या उपस्थितीत संपन्न झाला. तर २१ मार्च १९५९ रोजी सुवर्ण महोत्सव साजरा करण्यात आला. शाळेच्या १९८३ मध्ये झालेल्या अमृत महोत्सवाला तत्कालीन मंत्री सुधाकरराव नाईक , मुळचे अमळनेर येथील विप्रो कम्पनीचे उद्योगपती अझीम प्रेमजी उपस्थित होते. अझीम प्रेमजी यांनी उदारपणे दिलेल्या देणगीतून शाळेत तांत्रिक कक्ष निर्माण झाला. १९९५ च्या सुमारास शाळेत संगणक शिक्षण सुरू झाले. १७ ऑगस्ट २००८ रोजी संस्थेचा शतकमहोत्सव खूप उस्थाहात साजरा झाला. या शाळेला पूर्ण डिजिटल शाळा करण्यासाठी प्रयत्न होत असून माजी विद्यार्थ्यांचा एक मोठा मेळावा घेण्याचा मानस विद्यमान मुख्याध्यापक प्रमोदिनी पाटील यांनी व्यक्त केला. त्या स्वतः साने गुरुजी प्रेमी असल्याने जळगाव येथील नोकरी सोडून या शाळेत दाखल झाल्या आहेत. अत्यन्त तळमळीने विद्यार्थी घडविण्याची येथील गौरवशाली परंपरा त्या व इतर शिक्षक मनोभावे पार पाडत आहेत. खरं म्हणजे, मी, माझी पत्नी अलका, माझी भावजय स्मिता, माझा पुतण्या स्वप्नील, त्याची वागदत्त वधू शिबानी, तिचे वडील , या शाळेचेच माजी विद्यार्थी संजय अंधारे असे सर्व न कळवता शाळेत गेलो होतो. पण याविषयी जराही नाराजी न दाखवता, उलट अत्यंत आनंदाने पाटील मॅडमनी आम्हाला सर्व परिसर, शाळा, स्मृति कक्ष दाखवला. गुरुजींच्या हस्ताक्षरातील कविता, शतकमहोत्सवानिमित्ताने प्रकाशित करण्यात आलेली स्मरणिका आम्हाला भेट दिली. या लेखनासाठी या स्मरणिकेचा आणि पाटील मॅडमनी अगत्याने दिलेल्या माहितीचा खूप उपयोग झाला, हे येथे नमूद केले पाहिजे. आमची ही भेट संस्मरणीय ठरवली याबद्दल पाटील मॅडम आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार. साने गुरुजींना विनम्र अभिवादन. संस्थेच्या पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रेरक पत्रकारिता



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रामुख्याने ओळख आहे ती भारतीय घटनेचे शिल्पकार म्हणून. जगात आजही भारताची राज्यघटना एक आदर्श राज्यघटना म्हणून समजली जाते. असे जरी असले तरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे व्यक्तिमत्त्व अष्टपैलू होते. धर्मशास्त्राचे अभ्यासक, अर्थशास्त्राचे अभ्यासक, कामगार नेते, राजकीय पक्षाचे संस्थापक द्रष्टे विचारवंत विविध सामाजिक चळवळींचे जनक याबरोबरच त्यांनी केलेली पत्रकारिता आजही प्रेरक ठरेल अशीच आहे.

दलित पत्रकारितेचा प्रारंभ :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्रकारितेला 1920 मध्ये प्रारंभ झाला. तथापि, त्यांच्यापूर्वी 1888 साली गोपाळ बाबा वलंगकर यांनी पत्रकारितेस सुरुवात केली होती. 23 ऑक्टोबर 1888 रोजी त्यांनी ''विचार विध्वंस'' नावाची पुस्तिका लिहिली होती. समाजाने निर्माण केलेल्या दुष्टचक्रातून अस्पृश्य वर्गाला कसे बाहेर काढावे याचा ध्यास त्यांना लागलेला

होता. दलित समाजातील ते पहिले पत्रकार होते असे म्हटल्यास वावगे ठरू नये. त्यानंतर दलित समाजातील शिवराम जानबा कांबळे यांनी ''सोमवंशी मित्र'' हे पहिले दलित साप्ताहिक प्रकाशित केले. पूर्णपणे स्वत:चे अग्रलेख लिहिणारे ते पहिले दलित पत्रकार होते. किसन फागु बंदसोडे यांनी निराश्रीत हिंद नागरिक हे पत्र 1910 साली ''विटाळ विध्वंसक'' 1913 व 1918 साली ''मजूर पत्रिका'' सुरू केले. एका मागोमाग एक तीन वृत्तपत्रे सुरू करून त्यांनी जनतेचे प्रश्न समाजासमोर मांडण्याचा प्रयत्न केला. बंदसोडे यांनी पत्रकारितेमध्ये नवीन आदर्श निर्माण केला. 1914 मध्ये विदर्भातील गणेश गवई यांनी ''बहिष्कृत भारत'' हे वृत्तपत्र काढले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे निश्चित भुमिकेतून पत्रकारितेकडे वळले होते. 1917 साली विविध जाति जमातींच्या मतदानाच्या अधिकारांच्या संदर्भात काही कर्त्या व्यक्तींच्या साक्षी काढण्यासाठी शासनाने साऊथबरो कमिशन नेमले होते. या कमिशनच्या निमित्ताने अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांसाठी झगडण्याची प्रेरणा त्यांना मिळाली. त्यांना अस्पृश्यांचे म्हणणे जगाच्या वेशीवर टांगण्यासाठी आपल्याजवळ नेहमीसाठी एखादे साधन असावे असे वाटले. ''पंखाशिवाय जसा पक्षी त्याप्रमाणे समाजात विचार प्रवृत्त करण्यासाठी वृत्तपत्राची गरज असते'' हेही त्यांना तीव्रपणे जाणवत होते आणि उपलब्ध वृत्तपत्रे तर विशिष्ट जातींचीच चाकरी करणारी अस्पृश्यांवर अन्यायच बहुतांशी करणारी होती. याचा अर्थ वृत्तपत्राविना अस्पृश्य समाज अनाथ होता. त्यांच्याजवळ विलक्षण अशा करुण कहाण्या होत्या. म्हणून या मूक समाजाच्या वेदना व विद्रोह प्रकट करण्यासाठी एखाद्या प्रकाशनपीठाची गरज होती. या गरजेतून डॉ. बाबासाहेब आंबेडकर पत्रकारितेकडे वळले.

****

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुरू केलेली वृत्तपत्रे :

(1) मूकनायक : समाजाच्या वेदना व विद्रोह प्रकट करण्यासाठी 'मूकनायक' या पत्राच्या पाक्षिकाच्या 31 जानेवारी, 1920 रोजी जन्म झाला. मूक अशा अस्पृश्यांचे नायकपण-नेतेपण आपण स्वीकारल्याचे मूकनायक काढून 1920 साली त्यांनी जाहीर केले. मूकनायकाने त्यांच्या पुढील घणाघाती चळवळीची नांदीच जणू म्हटली. यासाठी त्यांना राजर्षी शाहू महाराज यांचे आर्थिक सहकार्य लाभले होते. त्यामुळे पहिल्या अंकाच्या संपादकीयामध्ये ही जन्मप्रतिज्ञा अशी व्यक्त केली.

''आमच्या या बहिष्कृत लोकांत होत असलेल्या व पुढे होणाऱ्या अन्यायावर उपाययोजना सुचविण्यास तसेच त्यांची भावी उन्नती व तिचे मार्ग यांच्या खऱ्या स्वरूपाची चर्चा होण्यास वर्तमानपत्रासारखी अन्य भूमीच नाही. परंतु मुंबई इलाख्यात निघत असलेल्या वृत्तपत्राकडे पाहिले असता असे दिसून येईल की, त्यातील बरीचशी पत्रे विशिष्ट अशा जातिचे हितसंबंध पाहणारी आहेत. इतर जातिच्या हिताची पर्वा त्यांना नसते इतकेच नव्हे तर, केव्हा केव्हा त्यांना अहितकारक असेही त्यातून प्रलाप निघतात. अशा वृत्तपत्रकारांना आमचा इशारा एवढाच की, कोणतीही एखादी जात अवगत झाली तर तिच्या अवनतीचा चट्टा इतर जातीत बसल्याशिवाय राहणार नाही. समाज ही नौकाच आहे. ज्याप्रमाणेआगबोटीतून प्रवास करणाऱ्या उतारुने जाणूनबुजून इतरांचे नुकसान करावे म्हणून म्हणा किंवा आपल्या विनाशक स्वभावामुळे म्हणा जर का इतरांच्या खोलीस छिद्र पाडले तर सर्व बोटीबरोबर त्यालाही आधी किंवा मागाहून जलसमाधी ही घ्यावीच लागणार आहे. त्याचप्रमाणे एका जातिचे नुकसान केल्याने, अप्रत्यक्ष नुकसान करणाऱ्या जातिचेही नुकसान होणार यात बिलकूल शंका नाही. म्हणूनच स्वहितसाधू पत्रांनी इतरांचे नुकसान करून आपले हित करावयाचे पढतमूर्खाचे लक्षण शिकू नये. ''

मूकनायकाचे ध्येय धोरण स्पष्ट करण्यासाठी त्यावर पुढील बिरुदावली छापली जात असे.

काय करून आता धरुनिया भीड | नि:शक हे तोड वाजविले ||1||

नव्हे जगी कोण मुकियाचा जाण | सार्थक लाजोनी नव्हे हित ||2||

तुकारामाच्या या ओळी त्यांनी बिरुदासाठी निवडाव्या यात केवढे तरी औचित्य आहे. वृत्तपत्राचे 'मूकनायक' हे नावही त्यांना ''नव्हे जगी कोणी मुकियाचा जाण'' या चरणावरून सुचले आहे हे निश्चित. बाबासाहेब विलायतेला गेले व 1923 मध्ये 'मूकनायक' बंद पडले.

2) बहिष्कृत भारत :

बहिष्कृत भारत हे पाक्षिक त्यांनी 3 एप्रिल 1927 रोजी काढले. या पाक्षिकाचे ते स्वत: संपादक होते. दुसऱ्या अंकापासून बहिष्कृत भारतावर बिरुदावली म्हणून ज्ञानदेवांच्या पुढील ओव्या उद्‌धृत केलेल्या असत.

आता कोंदड घेऊनि हाती |आरुढ पांइये रथी |

देई अलिंगन वीरवृत्ती |समाधाने |

जगी कीर्ती रुढवी | स्वधर्माचा मानु वाढवी |

इया भारापासोनि सोडवी | मेदिनी हे |

आता पार्थ नि:शंकु होई | या संग्रामा चित्त देई |

एथ हे वाचूनि काही | बोलो नये |

आता केवळ संग्राम |संग्रामाशिवाय दुसरे काहीही नाही |

अशी युद्धप्रेरणा डॉ. आंबेडकर प्रारंभापासून अस्पृश्यांमध्ये चेतवीत आहेत.

या वृत्तपत्रातील सर्व मजकूर बाबासाहेब स्वत: लिहीत असत. खूप लोक वर्गणीदार झाले नाही. कायमची आर्थिक तरतूद करणे बाबासाहेबांना शक्य झाले नाही. या सर्व व्यापातापामुळे बहिष्कृत भारत 15 नोव्हेंबर, 1929 रोजी बंद पडले. या पाक्षिकाचे एकूण 34 अंक निघाले. त्यातला 04 जानेवारी 1929 चा अंक सोडता सर्व अंकात अग्रलेख आहेत. 31 अंकांमध्ये आजकालचे प्रश्न ''प्रासंगिक विचार'' या सदरामध्ये त्यांनी स्फुट लेख लिहिले आहे. त्यांच्या स्फुट लेखाची संख्या 145 आहे.

बहिष्कृत भारतच्या पहिल्या अंकात बाबासाहेब म्हणतात :

सुधारणेचा कायदा अंमलात आला आहे. इंग्रजांच्या हातची सत्ता काही प्रमाणात वरिष्ठ हिंदी लोकांच्या हाती गेली आहे. बहिष्कृत वर्गाची प्रतिनिधीच्या बाबतीत मुळीच दाद न लावता ज्याप्रमाणे एखाद्या जनावराला त्याचा निर्दयी धनी कसाबाच्या स्वाधीन करतो, त्याचप्रमाणे बहिष्कृत वर्गाच्या लोकांना त्यांच्या मायबाप सरकारने वरिष्ठ हिंदी लोकांच्या स्वाधीन केले आहे. अस्पृश्यांची स्थिती सहा वर्षापर्वूपिक्षा आज जास्त शोचनीय आहे. ही शोचनीय स्थिती जगजाहीर करून होत असलेली हेळसांड टाळावयाची असेल व घडत असलेल्या अन्यायापासून व जुलुमापासून बचाव करावयाचा असेल तर वृत्तपत्राची जरुरी सहा वर्षापूर्वीपेक्षा आज अधिक तीव्र आहे.

बहिष्कृत वर्गाच्या लोकांना जर त्यांना संख्येच्या प्रमाणात प्रतिनिधी मिळाले नाही, तर त्यांच्या उन्नतीची इतिश्री झाली असेच समजावे. कारण ब्रिटिश सरकारचे नि:पक्षपाती धोरण आमच्या वरिष्ठ समाजाकडून ठरवले जाईल, इतकी त्यांची मनोभूमिका शुद्ध व सात्त्विक बनलेली नाही हा घोर प्रसंग टाळावयाचा असेल तर, आतापासूनच चळवळीला सुरुवात केली पाहिजे.

बाबासाहेबांच्या मृत्यूनंतर 1961 साली प्रबुद्ध भारत बंद पडले.

3) जनता :

जनता वृत्तपत्राचा प्रथम अंक 24 नोव्हेंबर 1930 रोजी प्रकाशित झाला. संपादक श्री. देवराव विष्णू नाईक होते. जनता प्रारंभी पाक्षिक होते. 31 ऑक्टोबर 1931 रोजी ते साप्ताहिक झाले.

या वृत्तपत्राची बिरुदावली म्हणून ''गुलामाला तु गुलाम आहेस असे सांगा म्हणजे तो बंड करून उठेल'' हे वाक्य होते. जनतेत त्यांनी सर्व निकडीचे प्रश्न चर्चिलेच पण जनतेतून विशेष म्हणजे त्यांनी विलायतेहून लिहून पाठविलेली पत्रे प्रकाशित झाली आहेत.

1955 पर्यंत जनता सुरू होते. या वृत्तपत्राचे संपादक वेळोवेळी बदलले. कधी त्यात अनियमितपणा निर्माण झाली पण तरी ते खूप दिवस टिकले. 4 फेब्रुवारी 1956 रोजी जनताचे नामकरण प्रबुद्ध भारत असे करण्यात आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्फुट लेखन :

प्रासंगिक प्रश्नावर लेख हे साधारण ! स्फुट लेखनाचे स्वरूप असते. या स्फुट लेखनाला विषयांची मर्यादा नसली तरी विस्तार मर्यादा निश्चित आहे. अशा स्फुटलेखनात लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचे, त्यांच्या जीवनदृष्टीचे, त्याच्या चिकित्सकतेचे आणि त्यांच्या विचार वैशिष्ट्याचे प्रतिबिंब उमटत असते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्फुट लेखन प्राधान्याने 'बहिष्कृत भारतात' आढळते. 'जनता' आणि 'प्रबुद्धभारतात' स्फुट लेखन प्रकाशित होत असले तरी ते डॉ. बाबासाहेबांचे नव्हते. बहिष्कृत भारताच्या 1927 सालच्या पहिल्या वर्षाच्या अंकात ''आजकालचे प्रश्न'' या सदरांतर्गत तर दुसऱ्या वर्षी 'प्रासंगिक विचार' या सदराखाली त्यांचे स्फुटलेखन प्रकाशित झाले आहे. विषयांचे वैविध्य हे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य होय.

बालविवाहाचे फलित, ब्राह्मण्याचे स्वरूप, वर्णाश्रमाचा प्रभाव, मंदिर प्रवेश, मातंग समाज, शुद्धिकार्य, सत्याग्रह, आर्यसमाजाचे कार्य, मनुस्मृती दहनाचे वादळ, सत्यशोधक चळवळीचा ध्येयवाद, सहभोजन, मजूर पक्ष, मिश्रविवाह, हिंदीकरण, देव, पुजारी व भक्त क्रांती, रोटी व्यवहार व बेटी व्यवहार, भिन्न वसाहती, व्यक्ती, सायमन कमिशन इत्यादी अशा अनेक विषयावर बाबासाहेबांनी लेखन केले.

डॉ. आंबेडकरांची वृत्तपत्रे आणि चळवळी :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या वृत्तपत्रातून प्रमुख चळवळी यथार्थपणे चालविल्या. त्या अशा :

1) मानगाव येथे कोल्हापूरजवळ परिषद घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांचे प्रश्न मांडले. राजर्षि शाहू महाराजांनी या परिषदेत डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाचे स्वागत करून त्यांच्याकडून या समस्यांना गती मिळेल असे अभिवचन दिले.

2) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाड येथे चवदार तळ्याच्या सत्याग्रह केला आणि त्याचे वर्तमान त्यांच्या बहिष्कृत भारत या वृत्तपत्रात आले आहे.

3) काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह हा एक महत्त्वाचा टप्पा होता. या चळवळीचे प्रतिबिंबसुद्धा डॉ. आंबेडकरांच्या वृत्तपत्रातून उमटले आहे.

4) डॉ. आंबेडकरांनी मनुस्मृती दहन करून जातिव्यवस्थेला विरोध केला.

5) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक न्याय चळवळीस येवला येथे आपण हिंदू जन्मलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही, अशी घोषणा केली.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रेरक पत्रकारिता

भाग - 2



डॉ. बाबासाहेबांचे विचार आणि सद्य:स्थिती :

बाबासाहेब हे सव्यसाची पत्रकार होते. सामाजिक प्रबोधन आणि सामाजिक न्याय ह्या तत्वांचा पत्रकारितेच्या क्षेत्रात त्यांनी आग्रह धरलेला होता. त्यांची सर्व पत्रे याच ध्येयवादाने भारलेली होती. नैतिकता हा तर त्यांनी वृत्तपत्रसृष्टीचा कणाच मानला होता. वृत्तपत्र हे जर जनकल्याणाचे साधन असेल तर मग पीत पत्रकारिता ही निषेधार्हच मानली पाहिजे.

महाराष्ट्रात एक ध्येयशील पत्रकारितेची परंपरा आहे आणि म्हणून व्यथित अंत:करणाने पण परखडपणे आपल्या ध्येयापासून वंचित होणाऱ्या पत्रांना त्यांनी आपल्या मूळ बैठकांची जाणीव दिली. वृत्तपत्रांनी आचारसंहिता पाळली नाही आणि तंत्र स्वैर असेल तर अज्ञजन रानभेरी होतील असे त्यांना वाटत होते.

भडक, विकृत आणि भावनांना आवाहन करणारे लेख लोकमानस घडवू शकणार नाहीत. लोकजीवनाला नवे परिणाम देऊ शकणार नाही अशी त्यांची खात्री होती. वृत्तपत्राचा खप वाढणे म्हणजे लोकमनाला संस्कारित करणारी विधायकता नव्हे. नि:पक्षपातीपणाचा अभाव आणि न्यायोचित लोककल्याणाच्या विचारांशी फारकत, लोकमनाची व लोकमताची अविकृत जडणघडण करु शकत नाही असा त्यांचा ठाम विचार होता. वृत्तपत्र हे शोषणाचे माध्यम बनविणाऱ्या प्रवृत्तींना त्यांनी धारेवर धरले.

त्यांच्या मते व्यक्तीपूजा ही भारतातील अनेक पत्रांना लागलेली कीड आहे. व्यक्तीपूजा आंधळी असते. त्यामुळे नीतिमत्ता ढळते म्हणून वृत्तपत्रांनी नीतिमत्तेला बाधा येणार नाही आणि सत्यापलाचा सूर बदलणार नाही ह्याची काळजी घेतली पाहिजे. वृत्तपत्र प्रपंच म्हणजे नीतिमत्तेचा प्रपंच अशी त्यांची धारणा होती.

जाहिरातीशिवाय वृत्तपत्रे जगू शकत नाही हे खरे असले तरी वृत्तपत्रांनी जाहिरातीच्या आहारी जावे का? आणि कितपत जावे! आर्थिक सवलतीसाठी जाहिराती आवश्यक असल्या तरी कोणत्या जाहिराती प्रकाशित कराव्यात यासंबंधीची संहिता पाहायला हवी, असे ते म्हणत. जाहिरातीची उद्दिष्टे आणि जाहिरात करण्याची पद्धती यात विरोध निर्माण झाला की, जाहिराती करण्यामागील तत्त्व भ्रष्ट होते असा त्यांचा दावा असे. जाहिरात आणि नीतिमत्ता यांचा अन्योन्यसंबंध बाबासाहेबांना अपरिहार्य वाटे. समाज उन्नतीचे साधन म्हणून त्यांनी वृत्तपत्राकडे पाहिले. लौकिक ऋण फेडण्यासाठी त्यांनी वृत्तपत्राचा प्रभावीपणे वापर केला.

बाबासाहेबांची पत्रकारिता या विषयावर डॉ. गंगाधर पानतावणे व विजया इंगोले यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातर्फे पीएच.डी प्रदान करण्यात आलेली आहे. डॉ. गंगाधर पानतावणे यांचे संशोधन ग्रंथरूपाने प्रकाशित झाले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून मांडलेले विचार, भूमिका आजही तंतोतंत लागू पडते, यावरूनच त्यांची दूरदृष्टी आणि विचारांची खोली दिसून येते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनपट :

1891 एप्रिल 14, जन्म : महू, मध्यप्रदेश

1900 नोव्हेंबर – सातारा येथील शासकीय विद्यालयात प्रवेश

1908 जानेवारी – मुंबई विद्यापीठाची मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण

1913 जानेवारी – पर्शियन आणि इंग्रजी घेऊन बी. ए. उत्तीर्ण

1913 जुलै – अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात (न्युयार्क) सयाजीराव गायकवाड यांची शिष्यवृत्ती घेऊन अभ्यासक्रमासाठी दाखल.

1915 – अर्थशास्त्र हा प्रधान विषय घेऊन एम. ए. उत्तीर्ण

1916 मे- "दि कास्ट इन इंडिया" या निबंधाचे वाचन. हा त्यांचा पहिला प्रकाशित निबंध

1916 जून – स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स व पोलिटिकल सायन्स, लंडन येथे दाखल

1917 – कोलंबिया विद्यापीठात पीएच.डीचे संशोधन पूर्ण

1917- स्मॉल होल्डिंग्ज इन इंडिया अँड देअर रेमिडिज प्रकाशित

1918 नोव्हेंबर – मुंबईच्या सिडेनहॅम महाविद्यालयात राजकीय अर्थशास्त्राचे प्राध्यापक

1920 जानेवारी- "मूकनायक" सुरू केले

1921 जून – लंडन विद्यापीठाची एमएसस्सी ही अर्थशास्त्रातील पदवी मिळवली.

1923 मार्च –"दि प्रॉब्लेम ऑफ रूपी" या प्रबंधाला अर्थशास्त्रातील डी. एस्सी. ही सर्वोच्च पदवी

1926 – मुंबई शासनात एम. एल. सी म्हणून नियुक्ती

1926 मार्च – चवदार तळ्याचा महाड येथील सत्याग्रह

1927 एप्रिल – बहिष्कृत भारत सुरू केले

1928 जून – सरकारी विधि महाविद्यालयात प्राध्यापक

1930 – जनता पत्र सुरू केले.

1930 ते 35 – काळाराम मंदिर सत्याग्रह

1930-32 – गोलमेज परिषद अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून सहभागी

1932 सप्टेंबर – पुणे करार

1935 जून – मुंबईच्या सरकारी विधि महाविद्यालयाचे प्राचार्य

1935 ऑक्टोबर – हिंदुधर्मत्यागाची येवला येथे घोषणा

1936 ऑगस्ट – स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना

1945 जुलै – पिपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना

1946 ऑक्टोबर –''हू वेअर शुद्राज'' प्रकाशित

1947 ऑगस्ट – घटना समितीचे अध्यक्ष

1947 ऑगस्ट – स्वतंत्र भारताचे पहिले कायदा मेत्री

1949 नोव्हेंबर – भारतीय संविधान सादर

1950 जून – औरंगाबादला मिलिंद महाविद्यालयाची स्थापना

1952 मार्च – कोलंबिया विद्यापीठाने एलएलडी पदवी दिली

1955 मे – भारतीय बौद्ध महासभेची स्थापना

1955 – प्रबुद्ध भारत सुरू

1956 ऑक्टोबर 14 –नागपूर येथेबौद्धधर्माचा स्वीकार

1956 नोव्हेंबर – जागतिक बौद्ध परिषदेला काठमांडू येथे प्रतिनिधी म्हणून हजर

1956 डिसेंबर 6 – दिल्ली येथे महापरिनिर्वाण

1957 –''बुद्ध अँड हिज धम्म'' ग्रंथाचे प्रकाशन

संदर्भसूची : 1. रणपिसे अप्पा, दलितांचे वृत्तपत्रे, प. 1-2

2. पानतावणे गंगाधन, पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, प्रतिमा प्रकाशन, पुणे, 1996, पृ. 6, 239, 240, 241, 247, 248

3. कानडे रा. गो. , मराठी नियतकालिकांचा इतिहास, कर्नाटक – मुंबई, 1934, पृ. 3

4. हिवराळे सुखराम, लोकपत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर, 1990, पृ. 9


5. आढावे, प्रशांत, माध्यम संशोधन पत्रिका

6. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची विलायतेहून आलेली पत्रे रमेश रघुवंशी पृ. 1 -2

7. निबंधकार डॉ. आंबेडकर, डॉ. यशवंत मनोहर, प. 18, 19, 20, 21, 22, 23, 103, 104

8. डॉ. आंबेडकर विचारमंथन, डॉ. वा. ना. कुबेर, पृ. 17, 18, 19, 20, 21, 22, 23, 24, 25, 26, 27, 28

स्वातंत्र्यवीर सावरकरांची जाज्वल्य पत्रकारिता




ऑस्ट्रेलियातील सिडनी येथे २८ मे २०१७ येथे झालेल्या चौथ्या विश्व सावरकर साहित्य संमेलनात देवेंद्र भुजबळ यांनी *स्वातंत्र्यवीर सावरकरांची जाज्वल्य पत्रकारिता या विषयावर व्याख्यान दिले. या व्याख्यानावर आधारित मराठी व इंग्रजी असे दोन भाषिक पुस्तक प्रकाशित झालेला 'स्वातंत्र्यवीर सावरकरांची जाज्वल्य पत्रिकारिता" हा निश्चितच वाचनीय दस्तवेज आहे.

महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे निवृत्त संचालक देवेंद्र भुजबळ यांनी अत्यंत परिश्रम घेऊन एका ज्वलंत विषयावर लिहिलेले, भरारी प्रकाशन, विलेपार्ले, मुंबई यांनी सुबकतेने प्रकाशित केलेले, लता गुठे यांनी पुस्तकाचा एकूण आशय स्पष्ट करणारे चितारलेले मुखपृष्ठ आणि त्रिमूर्ती आर्ट प्रिंटर्स यांनी मुद्रित केलेले, 'स्वातंत्र्यवीर सावरकरांची जाज्वल्य पत्रकारिता' हे पुस्तक नुकतेच वाचण्यात आले.

पुस्तकाचे शीर्षक, मनोवेधक मुखपृष्ठ, उत्कृष्ट छपाई, आकर्षक कागद आणि पुस्तकाचे बाह्यस्वरूप पाहून वाचक पुस्तकाच्या प्रेमात पडतो. पुस्तकातील आशय आणि विषय स्पष्ट करण्यासाठी लेखकाने घेतलेले परिश्रम, दांडगा अभ्यास, कथानकाची मांडणी या बाबी लक्षात येतात. शिवाय चरित्राचा नायक ज्यावेळी प्रखर हिंदुत्ववादी असतो त्या वेळी वाचक लेखकाच्या आणि सोबतच चरित्र नायकाच्याही प्रेमात पडतो. स्वातंत्र्यवीर सावरकरांचे कोणतेही चरित्र वाचताना वाचकांच्या अंगावर काटा येतो. अशीच काहीशी अवस्था सदरहू पुस्तक वाचताना वाचकांची होते.

स्वातंत्र्यवीर सावरकरांची पत्रकारिता हा विषय वाचताना वाचक अंतर्मुख होतो. काही प्रसंग वाचताना अंगावर शहारे येतात. ही कमाल लेखकाच्या चतुरस्त्र लेखणीची आहे, त्याच्या खोलवर अभ्यासाची आहे. शीर्षकात 'जाज्वल्य' हा शब्द आहे. जाज्वल्य या शब्दाचा शब्दशः अर्थ बघितला तर प्रखर, तेजस्वी असा आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात वि. दा. सावरकरांची लेखणी कशी प्रखर आणि तेजस्वी होती याची कल्पना हे पुस्तक वाचून येते. हे पुस्तक लिहिण्याची ऊर्मी म्हणा, स्फूर्ती म्हणा किंवा प्रेरणा कशी मिळाली हे स्पष्ट करताना लेखक मनोगतात म्हणतात, की लेखकाचा "भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रेरक पत्रकारिता" हा संशोधनपर लेख महाराष्ट्र शासनाच्या 'लोकराज्य' या मासिकात प्रकाशित झाला. या लेखाचा परिणाम असा झाला की, एक फार मोठी संधी लेखकाकडे चालून आली. जागतिक सांस्कृतिक सामाजिक परिषदेचे अध्यक्ष दीपक दळवी यांनी ऑस्ट्रेलियातील सिडनी येथे होणाऱ्या चौथ्या विश्व सावरकर साहित्य संमेलनात 'सावरकरांची पत्रकारिता' या विषयावर व्याख्यान देण्याचे निमंत्रण लेखक देवेंद्र भुजबळ यांना दिले. एक प्रकारे हा देवेंद्र भुजबळ यांच्या लेखणीचा, व्यासंगी वृत्तीचा सन्मान होता. जो संधीला सामोरे जातो, आव्हान स्वीकारतो तोच यशस्वी होतो. कोणतेही चरित्र लिहिणे आणि त्यातही सावरकरांविषयी लिहिणे हे एक प्रकारे आवाहनच होते. परंतु उपजत अभ्यासू वृत्ती, ज्ञानलालसा असलेल्या देवेंद्र भुजबळ यांनी ते आवाहन लीलया पेलले. मोठमोठ्या जवळपास अकरा ग्रंथांचा बारकाईने अभ्यास करून त्यांनी सावरकरांच्या


पत्रकारिता जीवनातील असंख्य मोती शोधून काढले. हे सारे ऐवज त्यांनी एकत्र गुंफून थेट सिडनी येथे 'सावरकरांची पत्रकारिता' या विषयावर उपस्थितीतांना मंत्रमुग्ध करणारे व्याख्यान दिले. हे व्याख्यान अतिशय गाजले. त्यातूनच पुढे 'स्वातंत्र्यवीर सावरकरांची जाज्वल्य पत्रकारिता' पुस्तकरूपाने आपल्यासमोर आली आहे. महत्त्वाचे म्हणजे या एकाच पुस्तकात मराठी आणि इंग्रजी या दोन भाषेत सावरकरांची पत्रकारिता समाविष्ट केली आहे.

सावरकरांच्या पत्रकारितेचा श्री गणेशा तसा माध्यमिक शाळेत शिकत असताना होतो. "हिंदू संस्कृतीचा गौरव" हा सावरकरांचा पहिला लेख "नाशिक वैभव" या वृत्तपत्रात दोन भागात प्रकाशित झाला असल्याचे लेखक नमूद करतात. त्यानंतर सावरकरांच्या पत्रकारितेचा प्रवास स्पष्ट करताना लेखक बारीकसारीक बाबींचा उल्लेख करतात. पुणे येथील फर्ग्युसन महाविद्यालयात शिकत असताना सावरकरांनी "आर्यन विकली "हे हस्तलिखित साप्ताहिक मित्रांच्या सहकार्याने सुरू केले. या साप्ताहिकातून सावरकरांनी देशभक्ती, साहित्य, इतिहास, विज्ञान या विषयांवर चौफेर आणि अभ्यासपूर्ण असे लेख लिहिले. या प्रकाशित लेखांपैकी काही लेख पुण्याच्या वृत्तपत्रांतून प्रकाशित झाले. सावरकर यांच्या लेखणीतून प्रसवलेल्या लेखांना न्युयॉर्कच्या "गॅलिक अमेरिका" या वृत्तपत्राने प्रकाशित केले. सोबतच हे लेख जर्मन, फ्रेंच, इटालियन, रशियन, पोर्तुगीज या भाषांमध्ये अनुवादित होऊन त्या त्या देशात प्रकाशित झाले. अशा प्रकारे सावरकरांच्या लेखांना थेट परदेशातील वाचकांनी स्वीकारले , असे म्हटले तर ते वावगे ठरू नये. एक प्रकारे हा वि. दा. सावरकर यांच्या विचारांचा, लेखणीचा गौरवच होता.

सावरकरांच्या अभिनव भारत या संघटनेचे 'तलवार साप्ताहिक' हे मुखपत्र होते. नावाप्रमाणे हातात असलेल्या लेखनरूपी तलवारीचा उपयोग त्या काळात कसा झाला असेल हे वाचकांनी ओळखलेच असेल. सावरकरांच्या लेखणीतून साकारलेल्या अनेक ग्रंथापैकीं एक ग्रंथ म्हणजे 'अठराशे सत्तावन्नचे स्वातंत्र्य समर' हा ग्रंथ! या पुस्तकाची महती म्हणजे सावरकरांच्या या ग्रंथावर सरकारने प्रकाशनापूर्वीच बंदी घातली. परंतु सावरकर डगमगले

नाहीत. त्यांनी ब्रिटिश, अमेरिकन, युरोपियन वृत्तपत्रांमधून सरकारवर प्रचंड टीका केली. सरकारच्या निर्णयामुळे सावरकरांनी तो ग्रंथ हॉलंडमध्ये छापला आणि त्याच्या प्रती फ्रान्स, अमेरिका, जपान, चीन या देशांसह हिंदूस्थानमध्येही पाठवल्या. नेपाळचे नेते ठाकूर चंदनसिंग हे सावरकरांना फार मानत होते. त्यांनी सावरकरांचे लेख अनुवादित केले आणि ते लेख 'तरुण गुरखा', 'हिमालयीन टाइम्स' यामध्ये प्रकाशित केले. मुंबई येथून सावरकरांनी 'श्रध्दानंद' या नावाचे एक साप्ताहिक सुरू केले. या साप्ताहिकातून आणि 'मराठा' या इंग्रजी पत्रात पं. नेहरु यांच्यावर घणाघाती टीका केली होती.

सावरकरांचे लेख, ग्रंथ संपदा केवळ हिंदुस्थानात नव्हे तर परराष्ट्रातही गाजत होती. अशा या प्रखर हिंदुत्ववादी, तेजस्वी पत्रकाराने २३ दिवसांच्या आत्मार्पणानंतर स्वतःचा देह २६ फेब्रुवारी १९६६ या दिवशी म्हणजे वयाच्या त्र्याऐंशीव्या वर्षी मृत्यूच्या स्वाधीन केला.



# छत्रपती राजर्षी शाहू महाराज




युग प्रवर्तक शाहू महाराज भारतातील सामाजिक सुधारणांचे प्रणेते छत्रपती राजर्षि शाहू महाराजांचा ६ मे हा स्मृतिदिन असतो. वयाच्या अवघ्या ४८व्या वर्षी त्यांचं मुंबईत आकस्मिक निधन झालं. त्यामुळे भारतीय सामाजिक सुधारणा चळवळीची मोठीच हानी झाली. त्यांच्या जीवनाचं अवलोकन केलं तर त्यांनी घेतलेले क्रांतिकारी निर्णय, राबविलेले सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, प्रशासकीय उपक्रम पाहून आपण नतमस्तक होतो.

शाहू महाराजांचा जन्म २६ जून १८७४ रोजी लक्ष्मी विलास पॅलेस, बावडा येथे झाला. १७ मार्च१८८४रोजी त्यांचं दत्तक विधान आणि राज्यारोहण होऊन करवीरच्या जनतेकडून त्यांना मानपत्र मिळाले. ३१ डिसेंबर १८८५रोजी शिक्षणासाठी ते गुजरातमधील राजकोटला रवाना झाले. एप्रिल १८८९मध्ये ते शिक्षण पूर्ण करून परतले. राजकोटला शिक्षण घेत असतानाही ते प्रसंगपरत्वे राज्यात हजर राहत. ८ मे १८८८ रोजी त्यांच्या हस्ते कोल्हापूर - मिरज रेल्वे मार्गाची पायाभरणी झाली. तर २० एप्रिल १८९१ रोजी गव्हर्नर लॉर्ड हॅरिस यांच्या हस्ते या रेल्वे मार्गाचं उद्‌घाटन झालं. शाहू महाराजांनी या रेल्वेचं स्वागत केलं. बडोदा येथील गुणाजीराव खानविलकर यांच्या कन्या लक्ष्मीबाई यांच्या बरोबर १ एप्रिल १८९१ रोजी त्यांचा विवाह झाला. १० मार्च १९९४ रोजी त्यांना राधाबाई ऊर्फ आक्कासाहेब हे पहिलं कन्यारत्न झालं. शाहू महाराजांना गव्हर्नर लॉर्ड हॅरिस यांच्या हस्ते २एप्रिल१८९४रोजी राज्य कारभाराची सूत्रं बहाल करण्यात आली. ही सूत्रं हाती येताच त्यांनी प्रजेला उद्देशून जन कल्याणाची ग्वाही देणारा पहिला जाहीरनामा जाहीर केला. स्त्री पुरुष समानतेची त्यांची भूमिका प्रत्यक्ष राज्य कारभारातून दिसू लागली. १ सप्टेंबर१८९४रोजी त्यानी सौ राधाबाई उर्फ रखमाबाई केवळेकर यांची स्त्री शिक्षण खात्याच्या अधीक्षक म्हणून तर जानेवारी १९०२ मध्ये कृष्णा बाई केळवकर यांची अलबर्ट एडवर्ड मेमोरियल हॉस्पिटलमध्ये सहायक डॉक्टर म्हणून नेमणूक केली. व्यापार उद्योगाचं महत्त्व ओळखून त्यांनी १८९५ मध्ये शाहूपुरी या नवीन व्यापारी केंद्राच्या उभारणीस प्रारंभ केला. तर शिरोळ येथे कापड गिरणीचे उद्‌घाटन केले. २७ सप्टेंबर१९०६ रोजी त्यांनी श्री शाहू स्पिनिंग अँड विव्हिंग मिलची पायाभरणी केली. शाहू महाराजांनी शिक्षणाचं महत्त्व जाणून १५नोव्हेंबर१९०६रोजी दि किंग एडवर्ड मोहमेडन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. या संस्थेचे ते अध्यक्ष होते. नोव्हेंबर१९०९ मध्ये लक्ष्मीबाई राणी साहेबांच्या हस्ते राधानगरी धरणाचं बांधकाम सुर केलं. ११ जानेवारी१९११रोजी त्यांनी कोल्हापूर येथे श्री शाहू सत्यशोधक समाजाची स्थापना केली. त्याच वर्षी २० मे रोजी त्यांनी आर्थिक दृष्टीने दुरबल असणाऱ्यासाठी फी माफीचा व पुढे सप्टेंबर महिन्यात मागासवर्गीय

विद्यार्थ्यांच्याही ही माफीचा क्रांतिकारी निर्णय घेतला. पुढे प्रत्येक गावात शाळा सुरू करण्याचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. फासे पारधी लोकांना सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी घरबांधणी योजना मंजूर केली. शाहू महाराजांनी सहकार चळवळ उभी केली. १जून १९१३रोजी त्यांनी भारत सरकारचा सहकारी संस्था कायदा, १९१२ लागू केला. ३०सप्टेंबर रोजी कोल्हापूर अर्बन को-ऑपरेटीव्ह सोसायटी ही पहिली सहकारी संस्था स्थापन केली. जुलै १९१७ मध्ये त्यानी विधवा विवाह कायदा आणि विवाह नोंदणी कायद्याची अंमलबजावणी केली. त्याच वर्षी त्यांनी सप्टेंबर महिन्यात सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. शाहू महाराजांनी २२ फेब्रुवारी१९१८रोजी बलुतेदारीं पद्धत कायद्याने बंद केली. तर मिश्र व आंतरजातीय विवाहाला पाठिंबा जाहीर केला. २७ जुलै १९१८रोजी त्यानी अस्पृश्यांची गुलामगिरी नष्ट करणारा आणि त्यांना मानवी स्वातंत्र्याचे हक्क देणारा जाहीरनामा जारी केला. २९ जुलै रोजी त्यांनी वंशपरंपरागत कुळकर्णी नेमणूक बंद करून पगारी तलाठी नेमण्याची पद्धत सुरू केली. मानवी हक्कांची पायमल्ली करणारी गुन्हेगारी जातिच्या लोकांची हजेरी पद्धत त्यांनी बंद केली. राज्यातील सरकारी आणि सर्व साधारण खात्यात अस्पृश्यांना अग्रक्रम देण्याचा आदेश ८ऑगस्ट १९१८रोजी त्यांनी दिला. तसेच अस्पृश्य समाजातील जे तलाठी बुद्धिमान व कार्यक्षम असतील त्यांना कारकून किंवा अव्वल कारकून म्हणून नेमावे अशी आज्ञा दिली. दुष्काळ निवारण करण्यासाठी त्यांनी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. अस्पृश्यांना समानतेची वागणूक द्यावी म्हणून त्यांनी १ जानेवारी १९१९ रोजी वैद्यकीय सेवा खात्याला आदेश दिले. प्राथमिक, माध्यमिक शाळा, महाविद्यालयात अस्पृश्यांना समानतेची वागणूक देण्याचे व अस्पृश्य नोकरांना दयाळूपणे, समतेने वागविण्याचे आदेश दिले. तसंच वेगळ्या अस्पृश्य शाळा बंद करून सरकारी शाळांमध्ये सर्व जातिधर्माच्या मुलांना प्रवेश देण्याचे आदेश दिले. शाळातील जाति प्रथा बंद करून त्यानी मुलींना व स्त्रियांना मोफत शिक्षण लागू केले. ७ फेब्रुवारी १९१९ रोजी त्यांनी हिंदू - जैन यांच्यातील मिश्रजातीय विवाहांना कायदेशीर मान्यता दिली. भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी ३१ जानेवारी १९२० रोजी मूकनायक वृत्तपत्र

शाहू महाराजांच्या प्रमुख उपस्थितीत सुरू झाले. त्याच वर्षी २२मार्च रोजी माणगाव येथे बाबासाहेबांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या अस्पृश्य समाज परिषदेत त्यानी बाबासाहेबांचा गौरव केला. १७ एप्रिल रोजी त्यांनी नाशिक येथे अस्पृश्यांच्या वसतीगृहाच्या इमारतीची पायाभरणी केली. १३ मे रोजी त्यांनी वेठबिगारी बंद केल्याचा कायदा केला. हा कायदा मोडणाऱ्यांस जबर शिक्षेची तरतूद केली. ३० मे रोजी नागपूर येथे झालेल्या अखिल भारतीय अस्पृश्यता निवारण परिषदेचे शाहू महाराज अध्यक्ष होते. ७ जून रोजी महारांना गुलामगिरीतून मुक्त केल्याची आज्ञा त्यांनी दिली. दिल्ली येथे १६ फेब्रुवारी १९२२ रोजी झालेल्या अखिल भारतीय अस्पृश्यता परिषदेचे अध्यक्षस्थान शाहू महाराजांनी भूषविले होते. अशा या युगप्रवर्तक , सामाजिक सुधारणेच्या प्रणेत्याचा, आधुनिक भारताच्या जडणघडणीला नवी दिशा देणाऱ्या महान नेत्याचं मुंबईतील खेतवाडी येथील पन्हाळा लॉज बंगल्यात ६ मे १९२२रोजी , वयाच्या अवघ्या ४८व्या वर्षी आकस्मिक निधन झालं. दुसऱ्या दिवशी पहाटे करवीर नगरीत शिवाजी वैदिक विद्यालयाच्या मराठा विद्यार्थी पुरोहितांनी शाहू महाराजांचे अंत्यसंस्कार केले. ४८ तोफांची सलामी दिली. शाहू महाराज आपल्यातून देहरूपाने जरी गेले तरी त्यांच्या विचारांच्या , प्रत्यक्ष कृतीच्या रूपाने ते आपल्यात आहेतच. त्यांनी हाती घेतलेली समाज सुधारणा अजूनही पूर्ण झालेली नाही. ती पूर्ण करण्याची जबाबदारी आपल्याला पार पाडावयाची आहे. शाहू महाराजांना विनम्र अभिवादन.

# ’झुलवा’कार उत्तम बंडू तुपे



ज्येष्ठ साहित्यिक उत्तम बंडू तुपे यांचं दीर्घ आजारपणामुळे नुकतंच पुण्यात निधन झाले.


१६ कादंबऱ्या लिहिलेले उत्तम बंडू तुपे हे त्यांच्या गाजलेल्या झुलवा कादंबरीमुळे झुलवाकार म्हणूनच ओळखले जात. त्यांच्या काट्यावरची पोटं या आत्मकथनाला महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कार मिळाला होता. उत्तम बंडू तुपे यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील 'एनकूळ' गावी १ जानेवारी १९४२ रोजी झाला होता. त्यांचं शिक्षण फक्त तिसरी पर्यंत झालं होतं. पोटासाठी त्यांनी गाव सोडून पुणे गाठलं. सुरूवातीला त्यांना मोलमजुरी करावी लागली. पुढे ते महाराष्ट्र शासनाच्या लेखागार विभागात शिपाई म्हणून नोकरीला लागले. ते लिहू लागले. त्यांनी साहित्याचे विविध प्रकार समर्थपणे हाताळले. खुळी, कळा, कळाशी, नाक्षारी, भस्म, चिपाड, इंजाळ, झावळ या त्यांच्या अनेक कादंबऱ्यांना पुरस्कार मिळाले.

'आंदण' या कथा संग्रहाला महाराष्ट्र साहित्य परिषदेचा पुरस्कार मिळाला. 'झुलवा'ला राज्य सरकारचा पुरस्कार मिळाला होता.

ज्येष्ठ रंगकर्मी वामन केंद्रे यांनी तुपे यांच्या 'झुलवा'वर नाटक केले होते. अभिनेते सयाजी शिंदे आणि सुकन्या कुलकर्णी-मोने यांच्या भूमिका असलेल्या या नाटकाचं दिग्दर्शन वामन केंद्रे यांनी केले होतं. जळगावी १९९७ साली भरलेल्या कामगार साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचा त्यांच्यावर विशेष प्रभाव होता. काही महिन्यांपूर्वीच त्यांच्या पत्नी जिजाबाई यांचं निधन झालं होतं. त्यांच्या पश्चात २ मुलं आहेत. साहित्य संपदा: कादंबऱ्या:इजाळ, खाई, खुळी, चिपाड , झावळ , झुलवा , भस्म, लांबलेल्या सावल्या, शेवंती, संतू , लघुकथा संग्रह आंदण , पिंड , माती आणि माणसं.

अत्यन्त मनस्वी जीवन जगलेल्या या थोर साहित्यिकास भावपूर्ण श्रद्धांजली.

# आचार्य विनोबा भावे



आचार्य विनोबा भावे यांनी अनोख्या अशा भूदान चळवळीमुळे फार मोठी अहिंसक, शांततापूर्ण सामाजिक व आर्थिक क्रांती या देशात घडवून आणली, हे त्यांचे फार मोठे योगदान आहे.

विनोबाजींचे पूर्ण नाव विनायक नरहरी भावे असे होते. मात्र आपण संत ज्ञानदेवाला ज्ञानोबा, तुकारामाला तुकोबा म्हणतो, त्या धर्तीवर महात्मा गांधींनी विनायकाचे केले विनोबा. पुढे सर्व जगच त्यांना विनोबा भावे म्हणून ओळखू लागले.

विनोबाजींचा जन्म तत्कालीन मुंबई राज्यातील कुलाबा जिल्ह्यात ( आताचा रायगड) पेणजवळील गागोदे या गावी दिनांक ११ सप्टेंबर १८९५ रोजी झाला. त्यांचे घराणे प्रतिष्ठित व सुखी होते. त्यांचे आजोबा श्री. शंभुराव हे फार धार्मिक वृत्तीचे होते. मात्र, त्या काळातही, त्यांनी जातिपातीची, धर्माची, मानव जातिपातीचे भेदाभेद करणारी वृत्ती झुगारून दिलेली होती. विनोबांवर आपल्या आजोबांचा फार प्रभाव पडलेला दिसून येतो. वडिलांचे व विनोबांचे मात्र

कधीच पटले नाही. विनोबांनी चारचौघांसारखे शिकावे व मोठे व्हावे या वडिलांच्या इच्छेशी ते कधीच सहमत होऊ शकले नाहीत. आजोबांप्रमाणे आईचाही विनोबाजींच्या जीवनावर फारच प्रभाव पडलेला होता. आपल्या आईची एकेक वचने त्यांनी आयुष्यभर तत्वं म्हणून जोपासली. उदा. देतो तो देव , राखतो तो राक्षस, थोडयात गोडी-फारात लबाडी इत्यादि. विनोबाजींनी, त्यांच्या बाळकोबा, शिवाजी या भावडांनीही या तत्त्वाचं आमरण पालन केल. ही मातृभक्ती व तत्त्वनिष्ठता सर्वसामान्य माणसाला अचंबित करणारी अशीच आहे. ते व त्यांची भावंडे आजन्म ब्रह्मचारी राहिली होती.

वडिल नोकरीनिमित्त पुढे बडोद्याला गेले. त्यामुळे विनोबाजींचे शालेय शिक्षणही बडोदे येथेच झाले. ते अत्यंत बुद्धिमान विद्यार्थी होते. प्रत्येक परिक्षेत ते पहिले येत. गणित व संस्कृत हे त्यांचे आवडते विषय. वयाच्या दहाव्या वर्षापासूनच त्यांच्यात राष्ट्रभक्तीचे बीज पेरले गेले. पुढे या बीजाचेच एका महान वटवृक्षात रुपांतर होत गेले. चाकोरीबद्ध शिक्षणाचा निरर्थकपणा हेरून, ते बडोद्याहून मुंबईला इंटरची परिक्षा द्यायला गेले. पण मुंबईला न जाता त्यांनी काशी गाठली. काशीच्या रहिवासातच महात्मा गांधीजींचे भाषण झाले आणि त्या प्रभावातून ते गांधीजींचे अनुयायी बनले. गांधीजीबरोबर तेही आश्रमवासी बनले. पूज्य विनोबाजींच्या आचार विचारांचा प्रभाव महात्मा गांधींवरही पडला आणि त्यांना गांधीजींच्या जीवनात आदराचे स्थान प्राप्त झाले. म्हणूनच पुढे पहिला सत्याग्रही म्हणून महात्मा गांधींनी विनोबाजींचीच निवड केली. वर्ध्याचे श्रीमंत, सावकार जमनालाल बजाज यांनी महात्मा गांधींना वर्ध्याला आश्रम सुरू करण्याचे आमंत्रण दिले. पण गांधीजींनी त्यास नकार देताच जमनालालजींनी पूज्य विनोबांना पाठविण्याची विनंती केली. त्यांचा आग्रह मानून विनोबा भावे ८ एप्रिल १९२१ रोजी आपल्या काही शिष्य परिवारासह साबरमतीहून वर्ध्याला दाखल झाले. पुढे हा आश्रम स्थिरस्थावर झाल्यावर गांधीजींच्या आज्ञेनुसार त्यांनी प्रत्यक्ष स्वातंत्र्याच्या सत्याग्रहात भाग गेऊन सत्याग्रहींना मार्गदर्शन केले. सत्याग्रहातील सहभागाबद्दल त्यांना तुरुंगवासही भोगावा लागला.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लवकरच देशाने महात्मा गांधीना गमावले आणि एक मोठी पोकळी निर्माण झाली. यातून मार्ग काढण्यासाठी सर्व रचनात्मक कार्यकर्ते सेवाग्रामला जमले असताना ' सर्वोदय समाज' आणि 'सर्व सेवा संघ' या दोन संस्थाची स्थापना विनोबाजींच्या पुढाकाराने झाली. पुढे सन १९५१ साली त्यांनी काढलेली पदयात्रा, हाती घेतलेली भूदान चळवळ लोकांना एक नवा मूलमंत्र देऊन गेली. जीवनाची इतिकर्तव्यता झाली म्हणून त्यांनी प्रायोपवेशन करून १५ नोव्हेंबर १९८२ रोजी आपला देह ठेवला. भारतरत्न या सर्वोच्च नागरी पुरस्काराने त्यांना गौरविण्यात आले.

विनोबाजींचे आश्रमातील ऋषितुल्य जीवन, त्यांचे राष्ट्रकार्य, समाजसेवा, त्यांची गिताई आणि इतर साहित्य आजही आपल्याला एका दिव्य दीपस्तंभासारखे मार्गदर्शन करीत आहे. त्यांच्या आचार विचारांचा स्वीकार हीच मानवजातिच्या कल्याणाची किल्ली आहे. पूज्य विनोबांना कोटी कोटी प्रणाम.

वि. स. पागे:रोजगार हमी योजनेचे शिल्पकार



महाराष्ट्र राज्यात १९७२ च्या भीषण दुष्काळाच्या परिस्थितीवर मात करण्यासाठी आखण्यात आलेल्या रोजगार हमी योजनेचे शिल्पकार म्हणून कै. वि. स. पागे यांना संपूर्ण महाराष्ट्राच नव्हे तर सारा देश ओळखतो. रोजगार हमी योजनेच्या विधयेकावर विधान परिषेदेचे सभापती म्हणून बोलताना कै. वि. स. पागे यांनी 'रोजगार हमी योजना राबवण्यासाठी महाराष्ट्र सरकार तर वाटचाल करीतच आहे, परंतु भारतातील सर्व प्रांत या दृष्टीने वाटचाल करतील, केंद्र सरकार या गोष्टीला आशीर्वाद देईल', अशी अपेक्षा व्यक्त केली होती. केंद्र सरकार आता राष्ट्रीय स्तरावर रोजगार हमी योजना राबवत असल्याने कै. वि. स. पागे यांनी काढलेले उदगार सार्थ ठरले आहेत. अशा थोर, द्रष्टया विचारवंताचा हा थोडक्यात जीवन परिचय.

निष्णात वकील आणि प्रगल्भ बुद्धिमत्ता लाभलेल्या, आठ वर्षे विधान परिषेदेचे सभापतीपद भूषविलेल्या कै. वि. स. पागे यांनी महाराष्ट्राच्या विकासावर दूरगामी छाप उमटविली आहे. कै. वि. स. पागे यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील बागणी येथे २१ जुलै १९१० रोजी झाला. सांगली येथील विलींग्डन महाविद्यालयातून संस्कृतसह बी. ए. ची पदवी प्राप्त केल्यावर त्यांनी कोल्हापूर येथील विधि महाविद्यालयातून कायद्याची पदवी संपादन केली. त्यानंतर काही काळ त्यांनी वकिली केली.

देशाच्या स्वातंत्र्याच्या ओढीने त्यांनी विद्यार्थी दशेतच १९३० च्या कायदे भंग चळवळीमध्ये, १९४० च्या वैयक्तिक सत्याग्रहामध्ये व १९४२ च्या भारत छोडो आंदलनामध्ये सक्रिय सहभाग घेवून कारावास भोगला होता. महात्माजींच्या विचारावर त्यांचा गाढ विश्वास होता. अध्यात्माबरोबरच त्यांना भांडवलशाही, लोकशाही, समाजवाद, साम्यवाद हे विषयही प्रिय होते. बहुभाषी असलेल्या पागे यांचे मराठी, हिंदी, संस्कृत, बंगाली व गुजराथी भाषांवर प्रभुत्व होते.

राज्यातील विविध क्षेत्रांशी त्यांचा अत्यंत जवळून संबध आलेला होता. राजकारण, समाजकारण सहकार, शेती, सामाजिक सुधारणा अशा अनेक क्षेत्रांमध्ये ते सातत्याने सक्रिय राहिले. महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळाचे अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य स्वातंत्र्य सैनिक समिती, महाराष्ट्र राज्य सहकारी मंडळ, गांधी स्मारक निधी, नशाबंदी मंडळ, सुरसिंगार संसद, अल्पबचत योजना सल्लागार समिती, राष्ट्रीय एकात्मता समिती, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय अशा एक ना अनेक संस्थांच्या कार्यात त्यांनी मनस्वीपणे योगदान दिले. महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारे महाराष्ट्र विधान परिषदेवर १९५२, १९५४, १९६०, १९६६ व १९७२ असे एकूण पाच वेळा ते निर्वाचित झाले होते. त्यापैकी १९६० ते १९७८ पर्यंत अशी सलग १८ वर्षे त्यांनी विधान परिषदेचे सभापतिपद भूषविले होते. त्याबरोबर अखिल भारतीय पीठासीन अधिकारी परिषदांमधून विविध संसदीय समस्यांवर आणि कार्यपद्धतीमधील अडचणींवर त्यांनी

अभ्यासपूर्ण विचार प्रदर्शन केले. या परिषदांनी महत्त्वाच्या मुद्द्यांचा ऊहापोह करण्यासाठी नेमलेल्या समितीचे अध्यक्षपद भूषवून त्यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण अहवाल सादर केला. आजही सर्व देशभरातील विधिमंडळाचे व संसदेचे पीठासीन अधिकारी सभागृहाच्या कामकाजाचे संचालन करताना, अडचणींची परिस्थिती ऊद्भवल्यास त्या अडचणीवर तोडगा काढण्यासाठी या अहवालाचा आधार घेतात. राष्ट्रकुल देशांच्या पीठासीन अधिकाऱ्यांच्या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये भाग घेऊन त्यांनी आपल्या विचारांचा आणि अनुभवाचा लाभ इतर देशांना दिला.

कै. पागे यांचे अत्यंत मुलभूत स्वरूपाचे योगदान म्हणजे रोजगार हमी योजना होय. अकुशल शेत मजुरांसाठी रोजगार मिळणे हा त्यांच्या चिंतनाचा सततचा विषय होता. ग्रामीण भागातील अकुशल शेतमजूर, लहान जमीनदार यांच्यासाठी आदर्श ठरलेली रोजगार हमी योजना देशाला मार्गदर्शनपर ठरली आहे. कै. वि. स. पागेंनी विपुल लेखन केले आहे. "काम करण्याचा हक्क" , "कथा ही रोहयोंच्या जन्माची ", "नवे राष्ट्रदर्शन: रोजगार हमी योजना" "बेकारी निर्मूलनातून ग्रामविकास" या ग्रंथाबरोबरच 'संत चोखामेळा', 'पहाटेची नौबत', 'अमरपक्षी', 'कविता मम नाद नौबदी' हे काव्यसंग्रह, "निवडणुकीचा नारळ" "विश्वदर्शन", "तुका म्हणे जाऊ वैकुंठा चाल"' ही नाटके त्यांनी लिहिली.

आज देशस्तरावर रोजगार हमी योजना राबविली जात असताना या योजनेविषयी विविध मान्यवरांनी व्यक्त केलेली मते उद्‌धृत करणे अप्रस्तुत ठरणार नाही. जेव्हा सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील ११ गावात पथदर्शक म्हणून रोजगार हमी योजना राबविली जात असल्याचे व ही योजना राज्यभर विस्तारित करत करण्याचे विचार कै. वि. स. पागे यांनी पूज्य विनोबा भावे यांना सांगितले, तेव्हा विनोबाजी म्हणाले, "पागे ही योजना तर फारच छान आहे. बापूंचे ग्राम स्वराजाचे स्वप्न साकार होणार असे दिसते. आता ही योजना ११ गावांपुरती न ठेवता ती राज्यव्यापी, राष्ट्रव्यापी चळवळ करा. ”

रिझर्व बँक आणि जागतिक बँकेनेसुद्धा या योजनेतून साध्य होणाऱ्या कार्याबद्दल गौरवोद्गार काढलेले आहेत. २१ डिसेंबर २००४ रोजी संसदेमध्ये ‘द नॅशनल रुरल एम्प्लॉयमेंट गॅरंटी विधेयक, २००४ मांडण्यात आले. केंद्र सरकारने या विधेयकाचा उद्देश व हेतू वाक्यामध्ये कै. वि. स. पागे यांच्या मूळ कल्पनेतून साकार झालेल्या महाराष्ट्र रोजगार हमी योजनेच्या संदर्भात महाराष्ट्राने या बाबतीत सर्व प्रथम केलेल्या कार्याचा उल्लेख करून महाराष्ट्र हे अशा स्वरूपाच्या कायद्यांचे मार्गदर्शक राज्य असल्याचे नमूद केले आहे.

विधान परिषदेच्या सभापती पदावरून १९७८ साली निवृत्त झाल्यानंतर पागे यांनी त्यांच्या निधनापर्यंत मिळणाऱ्या निवृत्तिवेतनाशिवाय शासनाच्या विविध समित्यांवर पदाधिकारी म्हणून काम केल्याबद्दल केवळ एक रूपया नाममात्र वेतन घेऊन देशासमोर एक मोठा आदर्श निर्माण केला. दिनांक १६ मार्च १९९० रोजी त्यांचे निधन झाले. कै. वि. स. पागे यांनी विधिमंडळाच्या विविध विषयांवर अत्यंत मूलगामी व दिशादर्शक विचार मांडले. त्यांच्या विधान मंडळातील निवडक भाषणांचा व लेखांचा संग्रह महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातर्फे प्रसिद्ध करण्यात आला आहे. त्यांच्या नावाने विधिमंडळात अध्यासन सुरू करण्यात आले असून त्यामार्फत विविध प्रकारचे उपक्रम आयोजित करण्यात येतात.

रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून राज्याच्याच नव्हे, तर आज देशाच्या विकास कामांना एक निश्चित दिशा दाखविण्याचे महान कार्य पांगेजींनी केले. त्यांच्या या कार्याबद्दल देश त्यांचा कायम ऋणी राहील. पागेजींच्या स्मृतींना विनम्र आदरांजली!

# कर्मयोगी रामभाऊ मंडलिक



रायगड (पूर्वीचा कुलाबा) जिल्ह्याचे थोर सुपुत्र कै. रामभाऊ मंडलिक यांचा औद्योगिकीकरणामुळे झपाटयाने बदललेल्या रायगड जिल्ह्याच्या जडणघडणीत सिंहाचा वाटा आहे.

कै. रामभाऊंनी व्यक्तीगत दु:खाचा बाऊ न करता, ही दु:खे कुरवाळत न बसता बजाविलेल्या कर्तव्यकठोर भूमिकेची छाप आपल्या मनात घर करून बसते. रामभाऊंना माता-पित्यांचे छत्र फार काळ लाभले नाही. डोळ्यादेखत धर्मपत्नी व सहाही अपत्ये कैलासवासी झालेली पाहून त्यांचे मन किती होरपळले असेल याची कल्पनाही करवत नाही. असे दु:खाचे डोंगर उभे असूनही कै. रामभाऊंनी देशसेवेचे आपले कार्य आजन्म बजाविलेले पाहून आपण नतमस्तक होतो. त्यांच्याऐवजी दुसरी कुणी व्यक्ती असती तर वैरागी झाली असती वा झिजत झिजत जगत राहिली असती. पण बहुधा लोकमान्य टिळकांच्या अतीव प्रभावामुळे त्यांनी कर्मयोगी होण्याची शिकवण अंगी बाणविली. म्हणूनच त्यांची 'कर्मयोगी' ही उपाधी सार्थ ठरते.

पुणे येथे उच्च शिक्षण घेत असताना देशप्रेमाच्या भावनेने रामभाऊ भारले गेले होते. पत्रकारितेचा वारसा त्यांना वडिलांकडूनच लाभला होता. त्यांचे वडील कै. नारायणराव उर्फ

नाना मंडलिक 'सुधाकर' नावाचे साप्ताहिक पेण येथे १८८५ ते १९१७ पर्यत नियमितपणे चालवले होते. त्यांच्या मृत्यूनंतर या साप्ताहिकाचे पुन्हा डिक्लेरेशन करण्याची पाळी आली. कै. भास्करराव फडके ( हे पुढे रामभाऊंचे मित्रच झाले ) विहारी पत्राचे संपादक असताना त्यांना १९०७ साली शिक्षा झाली. ते पत्र जगविण्यासाठी लोकमान्य टिळकांनी रामभाऊंना त्याचे संपादकत्व स्वीकारण्यास सांगून आपला रामभाऊंवरील विश्वास प्रकट केला. या पत्राच्या संपादकपदी असतानाच रामभाऊंना राजद्रोहाच्या आरोपावरून पकडण्यात आले. त्यांच्या खटल्याचा निकाल लागून त्यांना २ वर्षे सक्तमजुरी व १ हजार रुपये दंड अशी शिक्षा झाली. ज्या दिवशी हा निकाल लागला, त्याच दिवशी लोकमान्य टिळकांनाही राजद्रोहाच्या आरोपावरून अटक करण्यात आली , हा एक योगायोगच होय! कै. रामभाऊंचे मन सशस्त्र उठावाकडे झुकल्याचे जरी दिसून येते, तरी ते नंतर काँग्रेसकडे वळले. देशात राहून काहीच करता येत नाही हे पाहून त्यांनी जपानला प्रयाण केले. मात्र तेथेही परिस्थिती फारशी अनुकूल नव्हती. पुढे भारतात परतल्यावर त्यांनी जनजागृतीसाठी वृत्तपत्राचे माध्यम निवडून दि. २५ ऑक्टोबर १९१९ रोजी सा. कुलाबा समाचार हे वृत्तपत्र सुरू केले. ‘जनता जनार्दनाची सेवा करणे’ हे या साप्ताहिकाचे ब्रीद रामभाऊंनी ठरवून दिले. जिल्हापत्र कसे असावे याविषयी त्यांनी सखोल विचार केला असल्याचे दिसून येते. आजच्या संपादकांनी व विशेषत: तरुण व होतकरू पत्रकारांसाठी हे विचार आजही एखाद्या दीपस्तंभासारखे मार्गदर्शन करु शकतात. यातूनच रामभाऊंची चिकित्सक व दूरदृष्टी दिसून येते. पत्रकारितेबरोबरच रामभाऊंनी राजकीय कार्यही अतिशय तेजस्वीपणाने केले. १९३६ मध्ये ते विधिमंडळासाठी निवडले गेले. विधिमंडळातील त्यांची कारकीर्द त्यांची अभ्यासू वृत्ती, निर्भीडपणा यामुळे फार गाजली. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभावच इतका जबरदस्त होता की, मोठमोठे सरकारी अधिकारी व मंत्रीही त्यांना वचकून असत. यातूनच त्यांच्या कार्याचे महत्त्व प्रतिबिंबित होते. रामभाऊ मंडलिक यांना कोटी कोटी प्रणाम!

**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे १३ वे वर्ष. श्री. देवेंद्र भुजबळ यांचे ई साहित्यवरचे हे पहिलेच पुस्तक.**

श्री. देवेंद्रजी भुजबळ हे पत्रकार, दूरदर्शन निर्माता, माहिती खात्यात अधिकारी म्हणून गेली ३५ वर्षे ते प्रसार माध्यमात सक्रिय आहेत. त्यांनी आजवर अनेक पुस्तके लिहून प्रसिद्ध केली आहेत. मराठी साहित्यक्षेत्रात त्यांची अनेक स्नेही मंडळी आहेत. त्यांना स्वतःच्या पुस्तकांसाठी प्रकाशक मिळायला तोटा नाही. पण देवेंद्रजी आपले पुस्तक ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील वाचकांना विनामूल्य देत आहेत. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कविराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर शंभू गणपुले (नऊ पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९ पुस्तके), डॉ. वसंत बागुल (१६ पुस्तके), शुभांगी पासेबंद (८ पुस्तके), अविनाश नगरकर (चार पुस्तके), नासा येवतीकर(७), डॉ. स्मिता दामले (९ पुस्तके), डॉ. नीतिन मोरे (२४ पुस्तके), अनील वाकणकर (६ पुस्तके), रत्नाकर महाजन (४ पुस्तके), अनंत पावसकर(चार पुस्तके), मधू शिरगांवकर (३), अशोक कोठारे (१० हजार पानांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (महाराष्ट्राचे मुख्य अभियंता, ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक, ४ पुस्तके), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १२ पुस्तके), विनीता देशपांडे (७ पुस्तके), उल्हास हरी जोशी(६), नंदिनी देशमुख (५), सुजाता चव्हाण (९), डॉ. वृषाली जोशी(१३), डॉ. नंदिनी धारगळकर(९) संयम बागायतकर(२), मीना खोंड(१) असे अनेक ज्येष्ठ, अनुभवी लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत पोहोचवतात. एकाही पैशाची अपेक्षा न ठेवता.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्यवृक्ष जागतिक पटलावर आपले नाव नेऊन ठेवील याची आम्हांला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं 'इ'यें । दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी॥